बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.११ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# निर्दयी औलादिंना फाशी द्या!

मनोज जरांगे म्हणाले आता **अति होतंय?**

केजमध्ये संतप्त जमावाने बस **पेटविली**

मस्साजोगमध्ये पोलीस अधीक्षक **तळ ठोकून**

दोन पोलीस अधिकारी तडकाफडकी **निलंबित!**



## मस्साजोग, सरपंच हत्येने राज्य हादरले

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्याच्या मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचं काल अपहारण झालं होतं. त्यानंतर त्यांची हत्या करून मृतदेह फेकून देण्यात आला. त्यानंतर आता बीडमध्ये वातावरण चांगलंच तापलं आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी आणि आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी मस्साजोग गावातील नागरिकांनी बीड-लातूर मार्गावर रास्ता रोको आंदोलन केलं, आंदोलकांना पोलिसांनी हटवण्याचा प्रयत्न केला असता या आंदोलनाला हिंसक वळण लागलं, नागरिकांनी एक एसटी बसही पेटवून दिली.दरम्यान मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी या सर्व पार्श्वभूमीवर मस्साजोग गावाला भेट दिली, त्यांनी आंदोलकांशी संवाद साधला. या हत्याकांडावर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील यांनी इशारा दिला आहे. आम्ही सीआयडी चौकशी करतो असा निरोप आला आहे. आरोपींना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे, आम्ही सरकारी वकील देणार असल्याचं पान २ वर...



### संतप्त जमावाने बस पेटवली

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ, केज येथे रस्ता रोको करत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. यादरम्यान मंगळवारी सायंकाळी संतप्त जमावाने बस पेटवून दिल्याने काही काळ तणाव निर्माण झाला. उपस्थित पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड ,पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे ,पोलीस हेड कॉ.राजकुमार गायकवाड यांच्यासह आर सी बी च्या जवानांनी तात्काळ हरकत घेत बसवर पाणी फेकत बस विझवण्यात यश मिळवले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.





### विशेष तपास यंत्रणेमार्फत व्हावा:पंकजा मुंडे

मस्साजोग येथील सरपंचाचा खून आणि परळीतील तरूण व्यापाऱ्याचे झालेले अपहरण हा प्रकार अतिशय गंभीर असून या दोन्ही घटनांचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारे व्हावा अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केली आहे. जिल्हयात घडणाऱ्या अशा घटनां विषयी आ. पंकजाताईंनी चिंता व्यक्त केली असून याविषयी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी आपण स्वतः चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### दोन पोलीस अधिकारी निलंबित!

बीड जिल्ह्याच्या मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. आधी त्यांचं अपहरण करण्यात आलं आणि त्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली. यावरून आता वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. दरम्यान या प्रकरणाची सीआयडी चौकशी होणार असून दोन पोलीस अधिकारी यांच्या निलंबनाचा प्रस्तव तयार करणार आहोत. या घटनेतील कोणालाही सोडणार नाही, असं बीडचे पोलीस अधीक्षक यांनी म्हटलं आहे.

## एकजूटीने उतरली 'विराट हिंदूशक्ती'

**आंदोलन:**हिंदूवरील अत्याचार थांबवण्याची मागणी




परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बांग्लादेशातील हिंदूवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावे या मागणीसाठी आज (१० डिसेंबर) मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून परळीत विराट हिंदू शक्ती एकजुटीने रस्त्यावर उतरली. तीव्र निषेध नोंदवत मानवाधिकार वापरुन बांग्लादेशातील हिंदूवर होणारे अत्याचार थांबवण्याची एकमुखी मागणी करणारे निवेदन देण्यात आले. या निषेध व जन अक्रोश आंदोलनात परळीतील सकल हिंदू समाज विराट संख्येने सहभागी झाला होता.

बांग्लादेशात हिंदूंवर होणारे अत्याचार थांबविण्यात यावे, या मागणीसह हिंदू मंदिरे पाडण्याच्या निषेधार्थ आज १० डिसेंबर रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने राष्ट्रपतींच्या नावे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, बांग्लादेशातील हिंदू व इतर सर्व अल्पसंख्यांकांवर कट्टरवाद्यांकडून होणारे हल्ले, लूटमार, जाळपोळ व महिलांवर होणारे हल्ले रोखण्यात यावेत.हे अत्याचार थांबले पाहिजेत. सध्याचे बांग्लादेश सरकार व इतर संस्था हे थांबवण्याऐवजी मूक प्रेक्षक बनले आहेत. हिंदूंच्या भावना दुखावणार्या व हिंदू मंदिरांना टार्गेट केले जात आहे. याचा सकल हिंदू समाज तीव्र निघेष करते. तसेच हिंदूवरील व त्यांच्या मंदिरावरील हल्ले थांबविण्यात यावे, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टावर चौकातून या निषेध आंदोलनास प्रारंभ झाला. राष्ट्रध्वज व भगवा ध्वजधारी पान २ वर...

## परळी शहरात भितीचे सावट!

**खळबळ:**प्रतिष्ठित युवा उद्योजकाचे अपहरण





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मध्ये सरपंच पतीचा अपहरण करून त्यांचा खून केल्याचा खळबळजनक प्रकार ताजा असतानाच काल रात्री परळी शहरातील प्रतिष्ठित युवा उद्योजकाचे अपहरण करण्यात आल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी आता गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया परळी शहर पोलीस ठाण्यात सुरू आहे.

याबाबत प्राथमिक माहिती अशी की, परळी शहरातील भाजपचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे यांचे चिरंजीव अमोल डुबे यांचे औद्योगिक वसाहत येथे उद्योग व पान २ वर...

## परळीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**कारवाई:** विनयभंगासह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

संभाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अझादनगर ते मिलिंदनगर रस्त्यावरील एका किराणा दुकानाच्या जवळून जात असलेल्या दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची घटना घडली.याप्रकरणी आरोपी विरुध्द विनयभंगासह ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, परळी संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मिलिंद नगर भागात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अल्पवयीन मुलगी व दुसरी एक मुलगी अशा दोघीजणी एका किराणा दुकानाच्या जवळून जात असताना आरोपी फिरदौस इसाद मोहमंद शेख रा. फुकटपुरा परळी हा उभा होता. दोन मुली तेथून जात असताना त्याने दोघींकडे पाहून डोळा मारला. जाने मन असे म्हणून मुलीच्या खांद्यावर हात टाकून घरामध्ये चल असे म्हणू लागला. तेव्हा तक्रारदार मुलीने विरोध केल्यानंतरही आरोपीने बळजबरीने अंगावर वाईट हेतूने लज्जा वाटेल असा हात पान २ वर...

## न्यायाधीशांच्या वक्तव्याची माहिती मागविली

**चर्चेतले:**सर्वोच्च न्यायालयाकडून दखल



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शेखर कुमार यादव यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात काही वादग्रस्त विधाने केली होती. आता सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या भाषणाची दखल घेतली असून या प्रकरणी उच्च न्यायालयाकडून माहिती मागवण्यात आली आहे. विश्व हिंदू परिषदेच्या लीगल सेलने रविवारी अलाहाबाद उच्च न्यायालय परिसरात एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कर्यक्रमात बोलताना न्यायाधीश यादव म्हणाले होते की, देशात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हिंदुस्थान चालेल, असं म्हणण्यास मला कोणताही संकोच वाटत नाही. तसेच ते पुढे बोलताना असेही म्हणाले होते की, हा कायदा आहे. कायदा हा खरे तर बहुसंख्यांकांनुसार चालतो. त्याला कुटुंब किंवा समाजाच्या संदर्भात बघा. बहुसंख्यांचे कल्याण आणि सुख ज्यात लाभते तेच मान्य केले जाईल.

विश्व हिंदू परिषदेने दिलेल्या निवेदनानुसार, न्यायाधीश यादव हे समान नागरी संहितेच्या (यूसीसी) समर्थनात बोलताना ते म्हणाले होते की, देशात वेगवेगळ्या समाजातील आणि धर्मातील लोकांसाठी वेगवेगळे संविधान असणे हे देशासाठी एखाद्या धोक्यापेक्षा कमी नाही. जेव्हा आपण मानवतेच्या विकासाबद्दल बोलतो तेव्हा ते धर्माच्या वर आणि संविधानाच्या मर्यादेत असले पाहिजे.तसेच पुढे बोलताना न्यायाधीश यादव म्हणाले की, धर्म, लिंग किंवा जात याची पर्वा न करता पान २ वर...

**आवाहन** आपापल्या गावात,वॉर्डात जयंती साजरी करा

## गोपीनाथ गडावर उसळणार अलोट गर्दी

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी येत्या १२ डिसेंबर रोजी गोपीनाथ गडावर राज्याच्या कानाकोपर्यातून मोठी गर्दी उसळणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान आपापल्या गावात, वॉर्डात जयंती साजरी करा तसेच मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचे वचन द्या असं आवाहन आ. पंकजाताईंनी केलं आहे.

यासंदर्भात आ. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियातून राज्यभरातील कार्यकर्त्यांना महत्वाचा संदेश दिला आहे, त्या म्हणाल्या, विधानसभा निवडणुकीत मराठवाड्यात महायुतीला अभूतपूर्व असं यश मिळालं आहे. या यशाबद्दल १२ डिसेंबरला मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त महायुतीच्या सर्व पान २ वर...



### संस्कार जिवंत ठेवण्यासाठी कार्यरत रहा


पुढे बोलतांना आ. पंकजाताई म्हणाल्या, १२ डिसेंबरला मी सकाळी ११ वा. गोपीनाथ गडावर येईल. सकाळी ११ ते दुपारी २ वा. दरम्यान गडावर नेहमीप्रमाणे कार्यक्रम होतील. ज्यांना यादिवशी यायला जमणार नाही, त्यांनी परंपरेप्रमाणे आपापल्या गावांमध्ये, वॉर्डामध्ये मुंडे साहेबांची जयंती साजरी करावी व त्यांना अभिवादन करावे आणि मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचं वचन द्यावे असे आवाहन केले आहे.

## मोफत रेशनपेक्षा रोजगार निर्मितीवर लक्ष द्या!

**निर्णय:**सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आवाहन

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारकडून मोफत रेशन वाटण्यासंबंधी महत्त्वाची टिप्पणी करण्यात आली आहे सर्वोच्च न्यायालयात सोमवारी अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत अन्न पुरवठा करण्यासंबंधी एका प्रकरणावर सुनावणी घेण्यात आली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारने गरीबांना फक्त मोफत रेशन देत राहण्यापेक्षा रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन केले.न्यायालय म्हणाले की, इतक्या मोठ्या प्रमाणात रेशन वाटण्याची पद्धत अशीच सुरू राहिल्यास राज्य सरकारे



तुष्टीकरणासाठी लोकांना रेशन कार्डचे वाटप करतच राहतील, कारण त्यांना ठाऊक आहे की या लोकांना धान्य पुरवण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे.

जर राज्यांना मोफत रेशन पुरवठा करण्यास सांगितले तर बहुतांश राज्य निधीच्या कमतरततेमुळे आम्ही करू शकणार नाहीत असे सांगतील, म्हणून सरकारचे लक्ष्य रोजगार निर्मिती हे असले पाहिजे, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. राज्य जर रेशन कार्डचे वाटप करणे सुरूच ठेवणार असतील तर त्यांना रेशनचे पैसे द्यायला लावले पाहिजेत का? असा प्रश्न देखील सर्वोच्च न्यायालयाने यावेळी उपस्थित केला.केंद्र सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, पान २ वर...

## वाळवंटातले वालीहीन!

असद ही ब्याद होती, सीरियाच्या भल्यासाठी त्यांना हाकलणे आवश्यकच होते; पण पुढे काय, याचे उत्तर ना सीरियनांकडे आहे ना पाश्चात्त्यांस त्यात स्वारस्य आहे.या पृथ्वीतलावर सीरियासारखा दुर्दैवी देश नसेल आणि सीरियन्ससारखे दुसरे अभागी नागरिक नसतील. या देशाचा प्रमुख स्वत:च्याच नागरिकांविरोधात रासायनिक अस्त्रे वापरतो, स्वत: अय्याशीत जगत असताना नागरिकांच्या अक्षरश: उद्ध्वस्त आयुष्याकडे काणाडोळा करतो आणि ज्याला आपल्या प्रजेविषयी कसलीही सहानुभूती नसते असा या देशाचा पदच्युत अध्यक्ष बशर अल असद याचा लौकिक. बंडखोरांच्या रेट्यामुळे या असदवर परागंदा होण्याची वेळ आली. सीरियन्ससाठी हा मुक्तीचा क्षण होता आणि एखाद्या निवडणुकीनंतर आपल्याकडे फटाके वाजावेत तशा हवेत बंदुकांच्या फैरी झाडत नागरिकांनी स्वातंत्र्य साजरे केले. या बशर यास देशाचे प्रमुखपद वारशातून मिळाले. याचे तीर्थरूप हफीज अल असद हे जवळपास ३० वर्षे सीरियाचे अध्यक्ष होते. ती त्यांची कमाई होती. गरीब घरातून आलेले हफीज राजकीय चळवळीकडे आकृष्ट झाले आणि बाथ पक्षातून चढत ते अध्यक्षपदापर्यंत पोहोचले. ते २००० साली गेले. त्यानंतर ते पद बशर यांस मिळाले. वास्तविक त्या वेळी ते पद त्यांच्या ज्येष्ठ बंधूकडे जाते. पण त्यांचेही अपघाती निधन झाल्यामुळे बशर यांस संधी मिळाली. वास्तविक त्या वेळी हे बशर अध्यक्षपदासाठी पात्र नव्हते. कारण वय. सीरियन घटनेप्रमाणे या पदासाठी किमान वय ४० हवे. पण बशर हे तेव्हा ३४ वर्षांचे होते. त्यामुळे या बशरभाईंसाठी घटनेत बदल केला गेला आणि अध्यक्षपदी त्यांची 'नियुक्ती' झाली. म्हणजे सुमारे पाच दशके या देशावर असद घराण्याचा अंमल आहे. तो आता संपला. अर्धशतकाहून अधिक काळच्या असद राजवटीत लक्षावधींचे प्राण घेणाऱ्या, तितक्याच जणांस तुरुंगात डांबणाऱ्या बशर यांच्या विरोधात उठाव झाला आणि त्यांना पत्नीसह दमास्कसमधून पळून जावे लागले. बांगलादेश, श्रीलंका आदी देशांत जे झाले त्याचीच ही अरब पुनरावृत्ती.ती ज्याच्यामुळे झाली ते बशर अल असद हे नेते म्हणून इतके नतद्रष्ट आहेत की मानवी संस्कृती विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या अत्यंत ऐतिहासिक अशा वारशाचे आपण रक्षणकर्ते आहोत ही जाणीव त्यांस कधीही नव्हती. वास्तविक ते पाश्चात्त्य विद्याविभूषित. नेत्रशल्यचिकित्सक. त्यामुळे ते आपल्या वडिलांप्रमाणे असणार नाहीत, सुधारणावादी असतील अशी अपेक्षा होती. ती पहिल्याच वर्षी धुळीस मिळाली. राजकीय विरोधकांचे २००१ सालचे आंदोलन त्यांनी थोरल्या असदांच्या शैलीत चिरडले. त्या वेळी इतका रक्तपात झाला की दमास्कसमध्ये रक्ताचे शब्दश: पाट वाहिले आणि त्यातील रक्तधारा आठवडाभर 'ओल्या' होत्या. खरे तर दमास्कस हे इसवी सनाच्याही आधीपासूनचे एक महानगर. तुर्की-चलित ऑटोमन साम्राज्याच्या काळातही दमास्कसची भूमिका महत्त्वाची होती आणि नंतर ब्रिटिशांच्या हाती हा सारा परिसर गेल्यानंतरही हे शहर त्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिले. 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' म्हणून ओळखले जातात ते टी. ई. लॉरेन्स यांचाही संबंध या शहराच्या जडणघडणीत होता. इराक, जॉर्डन, इस्रायल आदींस प्रागऐतिहासिक वारसा आहे. त्यांच्याइतकाच सीरियाही समृद्ध. यहुदी, अरब, कुर्द, अलवाईट्स, ख्रिश्चनांतील विविध अल्पसंख्य समुदाय इत्यादी अठरापगड नाही तरी डझनभर विविध धार्मिक/ वांशिक नागरिक या देशात राहतात. खुद्द असद हे अलवाईट्स पंथाचे. ही इस्लामच्या शिया शाखेतील एक फांदी. सुन्नींच्या तुलनेत शिया तसेही कट्टर नसतात. त्यात अलवाईट्स अधिकच सहिष्णू. त्यामुळेही असेल सीरिया हा अन्य अरब शेजाऱ्यांच्या तुलनेत नेहमीच प्रगतशील राहिला. हे एका अर्थी इराकच्या सद्दाम हुसेन याच्या राजवटीसारखे म्हणायचे. जगासाठी क्रूरकर्मा इत्यादी असलेला सद्दाम हा प्रागतिक होता आणि त्याच्या राजवटीत महिलांस बुरखा/ हिजाब आदींची सक्ती नव्हती. महिलांस त्या काळी शिक्षण सहज घेता येत असे. असद यांची राजवटही अशीच होती. सहिष्णू आणि धर्मनिरपेक्ष.त्या देशाचा बाज आता तसा राहील किंवा काय हा प्रश्न. या असद यांनी स्वत:च्या राजवटीस विरोध करणाऱ्यांविरोधात इतकी दडपशाही केली की त्यांच्यासाठी देशातील शत्रूंची संख्या सातत्याने वाढत गेली. पंथीय जवळिकीमुळे त्यांना शियांचे प्राबल्य असलेल्या इराणचा कायम पाठिंबा राहिला आणि इराण अमेरिकाविरोधी भूमिका घेत असल्याने रशियाही असद यांचा तारणहार राहिला. या दोघांच्या लष्करी/संरक्षण साह्याच्या जोरावर असद यांनी आपल्या देशात अनन्वित अत्याचार केले. परिणामी त्यांच्या विरोधात देशाच्या सर्व बाजूंनी बंडखोर सेना आकारास येत गेल्या. त्यांनाही अर्थातच परदेशी फूस होती. यातील सर्वात लक्षणीय 'एचटीएस' नावाने ओळखली जाणारी 'हयात तहरीर अल-शाम' ही संघटना. ही सुन्नी. त्यामुळे परिसरातील सुन्नी देश, संघटना यांच्याकडून तीस आर्थिक आणि अन्यही साहाय्य दिले जात असून असद यांच्याविरोधी संघर्षात ती आघाडीवर होती. अबू मोहम्मद अल जोलानी हा या संघटनेचा प्रमुख. गेल्या दशकभरापासून अधिक काळ जोलानी आणि त्याची संघटना असद यांच्या विरोधात उठावाच्या प्रयत्नात होते. त्याने प्रयत्नही बराच केला आणि सीरियाच्या सीमेवरील काही प्रांतांत त्याचे प्राबल्यही तयार झाले. तथापि त्याची आगेकूच असद हे इराण आणि रशियाच्या मदतीने रोखू शकले. हे या वेळी त्यांना शक्य झाले नाही कारण मुळातच पश्चिम आशियाचा प्रदेश कमालीच्या अस्थिरतेतून जात असून इराण, त्या देशाच्या मदतीने उभी असलेली हेझबोल्ला ही दहशतवादी संघटना यांचे साहाय्य असद यांस मिळेनासे झाले आणि युक्रेन युद्धात अडकलेले असल्याने रशियाचे अध्यक्ष पुतिन यांसही सीरियाच्या आणि त्यातही असद यांच्या दुखण्यात लक्ष घालणे अशक्य झाले. तेव्हा जोलानी याच्या धडकेपुढे असद यांच्या नेतृत्वाखालील अधिकृत फौजांनी पांढरे निशाण फडकावले. असद यांच्यासमोर देशत्यागाखेरीज पर्याय राहिला नाही.तथापि सीरियाची खरी अडचण पुढेच आहे. असद ही ब्याद होती आणि सीरियाच्या भल्यासाठी त्यांना हाकलून लावणे आवश्यकच होते; हे खरे. पण पुढे काय, हा त्यापेक्षाही गंभीर प्रश्न. कारण देश चालवण्यासाठेचे कौशल्य ना जोलानी यांच्याकडे आहे ना तितका पाठिंबा त्याला आहे. त्यास तूर्त तुर्कीचे साह्य आहे.

# कुस्ती स्पर्धेत लक्षवेधी लढती

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी तालुक्यातील हेळंब येथे ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रा महोत्सवानिमित्त प्रतिवर्षी शनिवार दि.७ ते ९ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या कुस्ती

स्पर्धेत नामवंत मल्लांनी हजेरी लावली होती.

या कुस्ती स्पर्धेमध्ये १०० रूपया पासुन ते २१,१०१/- पर्यंतच्या कुस्त्या लावण्यात आल्या. तसेच कुस्त्या पाहण्याची संधी कुस्तीप्रेमींना मिळाली. या कुस्ती स्पर्धेस बीड,लातुर, उस्मानाबाद, परभणी, या जिल्ह्यातुन पहेलवानांचा प्रतिसाद मिळाला. विविध ठिकाणच्या मल्लांनी सहभाग होता. यांच्यातील रोमहर्षक लढतीत प्रथम क्रमांकाची कुस्ती पै.दीपक कराड यांनी विजय संपादित केला.डोळ्यांचे पारणे फेडणारे प्रेक्षणीय सामन्यांचा आनंद प्रेक्षकांनी घेतला. शिवाय १००, ५००, १०००,१५००, २०००, ५००० तसेच शेवटी बक्षीस २१,१०१ हजार रूपये बक्षीसांच्या कुस्त्या लावण्यात आल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी विधान परिषद सदस्य संजय दौड यांनी श्री खंडोबा मंदिर येथे दर्शन व यात्रोत्सवात भेट दिली. तसेच कुस्ती स्पर्धाभेट दिली. या कार्यक्रमास तलाठी विष्णू गित्ते, पुरवठा अधिकारी बालाजी कचरे, पोलिस निरीक्षक अनमोल केदार, बालाजी आंधळे, बालाजी होळबे, बाबा होळबे हे उपस्थित होते. पंच म्हणून इंद्रजित होळंबे नाथराव आंधळे अंगद आंधळे अशोक आंधळे नाथराव आंधळे परमेश्व होळंबे राजेभाऊ पाळवदे यांनी काम पाहिले. चित्तथरारक सामने पाहण्यासाठी तालुक्यातील विविध गावचे हजारों कुस्तीप्रेमींना उपस्थित होते. या कुस्तीचे सामने यशस्वी करण्यासाठी हेळंब येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थ आदींनी परिश्रम घेतले.



### हलगीने वाढविली कुस्तींमध्ये रंगत:

तालुक्यातील हेळंब येथे श्री. खंडोबा यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये या कुस्ती दंगलींमध्ये अनेक जिल्ह्यातील पहेलवांनी आपले कसब दाखवीत होते. दरम्यान हलगीच्या तालावर पहेलवानांचा देखील उत्साह संचारला होता. कुस्ती म्हटली म्हणजे हलगी आली. कुस्त्यांमध्ये जसजशी चुरस वाढत होती. तसे तसे हलगीच्या ताल कुस्तींपटूंमध्ये उत्साहत संचारत होता. त्यामुळे हलगीने कुस्तींमध्ये रंगत वाढविली होती. चित्तथरारक सामने पाहण्यासाठी तालुक्यातील विविध गावचे हजारों कुस्ती प्रेमीं उपस्थित होते.

## आध्यात्मिक:हेळंब येथील श्री खंडोबा यात्रा

### खंडोबा यात्रेची उत्साहात सांगता

खंडोबा यात्रेनिमित्त मराठवाड्याच्या कानाकोपर्यातुन भक्त दर्शनासाठी आले होते. तीन दिवशीय यात्रा उत्साहात झाली. शनिवारी दि. ०७ डिसेंबर रोजी सकाळी गावातुन खंडोबाची पालखी वाजत गाजत काढण्यात आली. यळकोट यळकोट जय मल्हार च्या जयघोषाने हेळंब परिसर दणाणुन गेले होते. पालखीचे ठिक ठिकाणी ग्रामस्थांनी दर्शन घेतले. शोभेची दारु उडवणून पालखीचे स्वागत करण्यात आले. पालखीवर भंडारा उधळण्यात आला. ग्रामस्थ पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभागी झाले होते. रविवारी वाघ्या मुराळ्याचा कार्यक्रम झाला. सोमवारी कुस्त्यांची स्पर्धा घेण्यात आली.

### यात्रेनिमित्त दर्शनासाठी व खेळणीचे दुकानावर गर्दी

श्री.खंडोबा यात्रोत्सवा निमित्ताने राज्यातुन, जिल्ह्यातुन, तालुक्यातील , ग्रामस्थ व परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री खंडोबा मंदिर परिसरात मोठी यात्रा भरत असल्याने परिसरात खाद्य पदार्थ, खेळणी, वस्तू आदींसह विविधव वस्तू खेरदी व दर्शना साठी भाविकांची गर्दीहोत आहे. यात्रेनिमित्त खेळणीचे दुकाने थाटली होती. भाविकांची गर्दी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने यात्रा समितीने व परळी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख बंदोबस्तठेवण्यात आला होता.यावेळी ग्रामस्थांनी व भक्त मंडळीनी तीन दिवशीय यात्रोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## पान एक वरून

**निर्दयी औलादिना**

पोलिसांनी सांगितलं आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा एफआयआर चुकीचा झाला आहे. दोन पोलिसाचं निलंबन करायला हवं, त्यांनी ३०२ चं कलम लावायला पाहिजे होतं. आरोपींना अटक व्हायरला पाहिजे. त्या दोन्ही पोलिसांचं निलंबन व्हाव. आता तर हत्या झाली आहे, ही परिसीमा आहे. माज करू नका हे खूप वाईट आहे. एकदा जर मराठे बिथरले तर समाज मोठा उठाव करेल. हत्या होऊनही आमचे लोक संयमात आहेत.भविष्याचा तुम्ही विचार करा, जातीवाद होवू देवू नका, आम्ही जातीचा रंग दिलेला नाही. माझं डोकं पिसाळलं तर मी कोणाचं ऐकणार नाही असा इशारा यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

**एकजूटीने उतरली 'विराट**

महिलांनी या जनआक्रोश मोर्चाचे नेतृत्व केले. हा जनआक्रोश मोर्चा राणी लक्ष्मीबाई टावर- स्टेशन रोड- बस स्थानक मार्ग ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आला. एक है तो सेफ है कटेंगे तो बटेंगे चे फलक झळकावत भारत माता की जय, जय श्रीराम ,वंदे मातरम् आदी प्रचंड जयघोष करत हा जन आक्रोश मोर्चा शहराच्या प्रमुख मार्गावरून निघाला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण व अभिवादन करून प्रशासनाला निवेदन देत या आंदोलनाचा समारोप करण्यात आला. या आंदोलनात निषेध नोंदविण्यासाठी परळी शहरातील हजारोंच्या संख्येने हिंदू धर्मीय समाज बांधव सहभागी झाला होता.

**परळी शहरात भितीचे**

व्यापारीपेढी आहे. नेहमीप्रमाणे ते काल रात्री आपल्या ऑफिसमधून बाहेर मोटरसायकलवर बसत असताना अज्ञात पाच ते सहा जणांनी त्यांना बळजबरी उचलून गाडीत टाकले. व अंबाजोगाईच्या दिशेने घेऊन गेले. दरम्यान, त्यांच्याकडे मोठ्या रकमेची मागणी करत ती रक्कम सुपूर्द करा, मग तुम्हाला सोडून देतो, असे त्यांना सांगण्यात आले. घाबरून जाऊन अमोल डुबे यांनी गळ्यातील सोन्याची चैन, जवळील रक्कम व आपल्या ड्रायव्हरला फोन लावून काही रक्कम आणून अपहरणकर्त्यांना दिली. त्यानंतर अंबाजोगाई रस्त्यावरील रामरक्षा गोशाळेच्या पुढे गेल्यानंतर या अपहरणकर्त्यांनी त्यांना सोडून देऊन ते पसार झाले. चार ते पाच जण तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून आले होते. अपहरणाची घटना ऑफिसच्या सीसीटीव्ही कॅमेर्यातही कैद झाली आहे. परंतु, या घटनेने व्यापारी व परळी शहरात मोठी दहशत निर्माण झाली आहे. याप्रकरणी आता परळी शहर पोलीस ठाण्यात मोठ्या संख्येने व्यापारी, नागरिक जमा झाले असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

**न्यायाधीशांच्या वक्तव्याची**

समान नागरी संहितेमुळे सर्व नागरिकांना समान कायदा लागू होतो. यामध्ये विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा आणि उत्तराधिकार यासारख्या बाबींचा समावेश असेल. मुस्लीम समुदायाचे नाव न घेता न्यायाधीश म्हणाले की, बहुपत्नीत्व, तिहेरी तलाक आणि हलाला यासारख्या प्रथा अस्वीकारार्ह आहेत.आमचा पर्सनल लॉ याला परवानगी देतो असे जर तुम्ही म्हणता, तर ते मान्य केले जाणार नाही. आमच्या शास्त्रात आणि वेदांमध्ये देवी म्हणून ओळखल्या गेलेल्या स्त्रीचा तुम्ही अनादर करू शकत नाही. तुम्ही चार बायका ठेवण्याचा हक्क सांगू शकत नाही, असेही यादव म्हणाले होते. पुढे बोलताना देशव्यापी यूसीसीची आशा व्यक्त करताना, ते म्हणाले की, अयोध्येत राम मंदिर बांधण्यासाठी वेळ लागला, परंतु ते दिवस दूर नाही जेव्हा हे स्पष्ट होईल की एक देश एक कायदा असेल. जे लोक फसवण्याचा किंवा स्वतःचा अजेंडा चालवण्याचा प्रयत्न करतात ते फार काळ टिकणार नाहीत.सिटीजन्स फॉर ज्यूडिशियल अकाउंटेबिलिटी अँड रिफॉर्म्स या सामाजिक संस्थेने मंगळवारी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांना यासंबंधी पत्र लिहिले आहे. ज्यामध्ये नाराजी व्यक्त करत, न्यायाधीश यादव यांच्याविरोधात कारवाई सुरू करण्यासाठी इन-हाऊस चौकशीची मागणी करण्यात आली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष भारतीय मुस्लिमांना लक्ष्य केल्याचे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

**परळीत अल्पवयीन मुलीचा**

टाकला व घरी कोणाला सांगितले तर तुला मारून टाकीन अशी धमकी दिली. मुलगी मागासवर्गीय असल्याचे माहीत उत्सूनही त्याने जातीवाचक शिवीगाळ केली. या गंभीर प्रकरणी पीडित मुलीने भाऊ, मावशी यांना सांगित्यानंतर या मुलीला संभाजीनगर पोलीस ठाण्यात आणून पोलिसांना सर्व हकीकत सांगितल्यानंतर पोलिसांनी या आरोपी विरूध्द कलम ७५ (१) (ळ), ७५ (ळीं), ७८ (१) (ळ), ३५१ (२), ३५५ (३) प्रमाणे गुन्हा दाखल केलक आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संभाजीनगर पोलीस करीत आहेत.

**गोपीनाथ गडावर उसळणार**

आमदारांचा सत्कार तसेच मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांना गोपीनाथ गडावर निमंत्रित करण्याची माझी इच्छा होती. परंतू शपथविधीच्या अनिश्चित तारखांमुळे हे होऊ शकत नाही. असा कार्यक्रम जंगी मी नंतर भविष्यात घेईलच. परंतू सध्या मुंडे साहेबांची जयंती अत्यंत साध्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय मी घेतला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**मोफत रेशनपेक्षा रोजगार**

सरकार राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत गहू, तांदूळ आणि याच्यासह इतर जीवनावश्यक वस्तूंच्या स्वरुपात ८० कोटी गरीब लोकांना रेशन पुरवते. मात्र यावर याचिकाकर्ते वकील प्रशांत भूषण यांनी सांगितले की, असे असले तरी या योजनेतून २ ते ३ कोटी लोक वंचित राहतात.स्थलांतरित कामगारांना सहन कराव्या लागणार्या अडचणी आणि त्यांच्या वाईट परिस्थितीसंबंधी याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू होती. ज्यामध्ये न्यायालयाने यापूर्वी जे रेशन कार्डसाठी पात्र आहेत त्यांना १९ नोव्हेंबर २०२४ पूर्वी रेशन कार्ड द्यावेत असा निर्णय दिला होता.सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान एसजी मेहता आणि याचिकाकर्ते प्रशांत भूषण यांच्या शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान कोर्टाने या प्रकरणाची सुनावणी ८ जानेवारी २०२५ पर्यंत पुढे ढकलली आहे.



## ...नसता आंदोलन केले जाईल

### विजय शिंदे : ट्रांसफार्मर जळाल्याने नागरिकांचे हाल

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर भागातील ट्रांसफार्मर जळाल्याने गेल्या तीन दिवसापासून नागरिकांचे हाल होऊ लागले आहेत नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावे लागत असून टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे विजीतरन कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ ट्रांसफार्मर बसवावा नसता आंदोलन करण्यात इशारा नगरसेवक विजय शिंदे यांनी दिला आहे.

शहरातील शिवाजीनगर भागातील ट्रांसफार्मर जळाल्यामुळे गेल्या तीन दिवसापासून या भागातील नागरिकांचे हाल झाले आहेत या भागांमध्ये बजाज हॉस्पिटल असल्याने रुग्णांना नाही त्याचा त्रास सहन करावा लागत आहे ट्रान्सफॉर्मर बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला आहे त्याचबरोबर पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावा लागत आहे तर खाजगी टँकर कडून नागरिकांना विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे वृद्ध जेष्ठ नागरिकांनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ ट्रांसफार्मर बसवावा नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा नगरसेवक विजय शिंदे यांनी दिला आहे

## पान सहा वरून

**देवदहिफळमध्ये रंगली**

(ता. धारूर) गजानन तिडके याला तर मंठा (जि. जालना) येथील वैष्णवी साळुंके या सोळा वर्षीय महिला मल्लाने कांदेवाडी (जि.बीड) येथील सोहम खाडे या पैलवानाला चित करत रोमहर्षक सामन्यात धूळ चारली. विजयी मल्लांना रोख पारितोषिके देऊन प्रेक्षकांतून हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात आली. शंभर रुपयांपासून ७ हजार एक रुपयां पर्यंतची बक्षिसे या दंगलीत देवदहीफळ ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली. येथील रामभाऊ आंधळे, विष्णूपंत बडे, दामोदर बडे, शिवाजीराव बडे, बाबुराव बडे, गोपाळराव बडे, दामुआण्णा बडे, मुरलीधर बडे, राजेभाऊ बडे, अंगद वड्डे, वसंत तोंडे, सुग्रीव बडे, देवस्थान चे पुजारी किर्तीकुमार जगताप यांच्यासह आदि ग्रामस्थ व कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले. दिंद्रुड पोलिसांनी कुस्ती दंगलीत कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यासाठी भूमिका निभावली.

**जीनियस इंग्लिश स्कूलमध्ये**

भोसले सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मैदानी खेळ खूप महत्त्वाचे असून खेळामुळे संघ भावना आणि व्यक्तिमत्त्व विकास होत असल्याने खेळात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे मार्गदर्शन भोसले सरांनी केले नगरसेवक रणजित बनसोडे यांनी खेळात प्रगती करून विद्यार्थ्यांनी आपल्या देशाचे नाव शाळेच व आपल्या आई वडिलांच नाव उज्वल करावे, असे आवाहन केले तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या कुलकर्णी व गणेश खाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन देशमुख मॅडम यांनी मानले या पाच दिवसीय क्रीडा महोत्सवाचं मोठ्या थाटात उद्घाटन याप्रसंगी संपन्न झाला.

**माजलगावमध्ये हिंदु समाजाचा**

करण्यात आली आहे. या प्रसंगी ॲडव्होकेट तेरकर, ज्येष्ठ वकील विश्वास जोशी,भानुदास डक, ओंकार खुर्पे, व्यापारी महासंघाचे सुरेंद्र रेदासणी, भाजप तालुकाध्यक्ष अरुण राऊत,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले, माजी सभापती नितीन नाईकनवरे, बजरंग दल प्रमुख मनोज कोरडे, रुपालीताई कचरे, सौरभ जाधव, अभय कोकड, हनुमान कदम, बाबासाहेब आगे, दत्ता महाजन, पवन मानधने यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शिवसेना शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यासह मोठ्या संख्येने हिंदु व बौद्ध समाज उपस्थीत होता.

**खुन प्रकरणातील आरोपींना**

दरम्यान अपहरण करून त्यांची अतिशय निर्घुण हत्या करण्यात आली असुन याप्रकरणाला २४ तास उलटुन देखील अद्याप आरोपी समोर आलेले नाहीत. ही बाब अतिशय गंभीर व निंदनीय असुन महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी आहे. २४ तास उलटुन देखील आरोपी सापडत नाहीत यामुळे नातेवाईकानी मृताचे प्रेत ताब्यात घेण्यास नकार देत या घटनेच्या निषेधार्थ मसाजोगसह केज तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरलेली आहे. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी बघ्याची भुमिका नघेता याप्रकरणाकडे तत्काळ लक्ष घालुन आरोपींना अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली आहे..

**ध्वजदिन निधी संकलनासाठी**

विद्यासागर कोरडे, वीरमाता, वीर पत्नी,आजी माजी सैनिक, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.ध्वजदिन निधी संकलनामध्ये बीड जिल्हा पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी ध्वजदिन निधी अधिक जमा करण्यासाठी सर्वानी सहभाग नोंदवावा, आजी माजी सैनिक, वीरमाता, वीर पत्नी यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असेही यावेळी श्री स्वामी यांनी सांगितले.बीड जिल्हयासाठी ३५ लाख रुपये ध्वजदिन निधीचे उदिष्ट देण्यात आले असून ९७ लाख १० हजार रुपये ध्वजदिन निधी प्राप्त झाल्याचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी प्रस्ताविकात सांगितले.कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्लवनाने करण्यात आले. कुमारी स्वराली साळुंके, कुमारी देवकी साळुंके यांनी 'ए मेरे वतन के लोगो' हे गाणे गाऊन सभागृहाला स्तब्तध केले.यावेळी वीरमाता, वीर पत्नी, इयत्ता १० वी १२ वी मध्ये अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या सैनिकी पाल्याचां गौरव करण्यात आला. पाटोदा तालुक्यातील शहीद पाडुरंग तावरे यांच्या वीरमाता,वीर पत्नी, वडील यांना १ कोटीचा धनादेश देण्यात आला. ध्वजदिन निधी संकलनासाठी उत्कृष्ट कार्य करणा-या अधिकारी, कर्मचारी यांचाही सत्कार करण्यात आला. सुत्र संचालन व आभार प्रदर्शन श्री जोशी यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते ध्वजदिन निधी संकलनाला सुरुवात करण्यात आली व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**हिमाचलच्या खोऱ्यात वसलेली**

खूप आनंद होत आहे. चित्रपटात अमितने ओसीडीशी झुंजणाऱ्या पतीची भूमिका साकारली होती. या भूमिकेबद्दल तो म्हणाला, ही माझी सर्वात आव्हानात्मक भूमिका आहे. याने मला भावनिक खोलवर जाण्याची परवानगी दिली, मी यापूर्वी कधीही गेलो नव्हतो. मला आशा आहे की प्रेक्षक आमच्या पात्रांच्या कथेशी जोडले जातील. रॅबिट हाऊसने यापूर्वीच आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. या चित्रपटाला २०२४ च्या कॉलेड स्पर्धेत फीचर फिल्म कॅटेगरीमध्ये मेरिटचा पुरस्कार मिळाला आहे आणि चौरी चौरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला आहे. अमित रियानला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे.चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान पुणेकरांना मंत्रमुग्ध केले

**आरोपीनां कठोर शासन**

मूल्यांचे अवमूल्यन झाले असून बीड जिल्ह्यात काही गुंड अपप्रवृत्ती दहशत माजवू पहात आहेत. अशा दहशत खोरांना कायदेशीर रित्या चोख उत्तर देऊन प्रशासनाने कायद्याचा धाक दाखवणे गरजेचे आहे दहशत खोरा विरुद्ध भिम स्वराज्य सेना आक्रमक पणे लोकशाही मार्गाने लढणार असल्याचे ही निवेदनात ड विकास जोगदंड यांनी नमूद केले आहे.

**बेलगुडवाडीत दत्त**

प्रभाकर पवार, माऊली म.पवार, भागवत म.चोरगे यांची साथ लाभणार असून दि. १४ डिसेंबर रोजी हभप मधुकर म.डोईफोडे यांच्या अमृततुल्य काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होणार असून यानंतर भागवत बळीराम पवार यांच्या वतीने महाप्रसादाची पंगत होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी बेलगुडवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## हॅप्पी बर्थडे





**गिरीश शेवाळे**
दादर पेपर विक्रेता

**कामना जेठमलानी** – अभिनेत्री
**रती अग्निहोत्री** – अभिनेत्री
**वरुण पालकर** – मीडिया
**उमाकांत दांगट** – निवृत्त आयएएस अधिकारी
**पंकज कस्तुरे** – व्यवसाय
**अंकुश काकडे** – काँग्रेस नेते
**हर्षा खिनखिनकर** – कवी
**मुरलीधर चंद्रकांत भंडारे** – काँग्रेस नेते
**गायत्री रामदासी** – कवी
**गजानन दौड** – पत्रकार
**दिलीप जोशी** – योगा
**मनोज व्हटकर** – पत्रकार
**नामदेव गरूड** – शिक्षक
**मिलिंद लिमये**, पत्रकार

# विधानसभेत मांडलेल्या १४ सुधारणा अध्यादेशावर हिवाळी अधिवेशनात होणार चर्चा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राज्य विधिमंडळाच्या तीन दिवशीय विशेष अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकूण १४ सुधारणा अध्यादेश मांडले. या अध्यादेशांवर नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात चर्चा केली जाणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेत स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या अध्यादेशात नगरविकास, नगर पंचायती व औद्योगिक नगरी, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबासस प्रतिबंध, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत, हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करणे, महाराष्ट्र वस्तु व सेवा कर, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराण वास्तुशात्र विषयक स्थळे व अवशेष, राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षीत जिल्हा परिषदांचे अध्यक्ष उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उपसभापती या पदांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतुद करणे, महाष्ट्र मुद्रांक अधिनीयमामध्ये सुधारणा, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रथांलये, महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणे, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ आदीचा समावेश आहे. नुकतेच झालेल्या सुप्रसिद्ध उद्योगपती रतन नवल टाटा, माजी मंत्री मधुकर पिचड, माजी मंत्री रोहिदास चुडामन पाटील, माजी मंत्री बाबा झियाउद्दीन सिद्धिकी, लोकसभा सदस्य वसंतराव चव्हाण, ज्ञानेश्वर रावसाहेब पाटील, निवृत्ती विठ्ठलराव उगले, रामकृष्ण रघुनाथ पाटील, उल्हास काळोखे, अर्जुनसिंह विरसिंग वळवी, हिराराम वरखेडे, सिताराम दळवी, विजय ऊर्फ आप्पा दत्तात्रय साळवी, हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांना विधिमंडळात शोक व्यक्त करत दोन्ही सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले.

# मुंबई स्थानकांतील वाढती गर्दी कमी करण्यासाठी हटवले स्टॉल!

## फलाटांवरील दुकाने नेऊन टाकली दुसऱ्या टोकाला

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

रेल्वे प्रशासनाने स्थानकांतील प्रवाशांची वाढती गर्दी कमी करण्यासाठी फलाटांवरील दुकाने दुसऱ्या टोकाला नेण्याचा निर्णय घेतला. परंतु अजूनही मोक्याच्या ठिकाणांची दुकाने कायम असल्याने या निर्णयाचा प्रत्यक्ष फायदा प्रवाशांना झाला का, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील प्रमुख गर्दीच्या स्थानकांवरील स्थिती पाहता या निर्णयाची अंमलबजावणी पूर्णपणे झालेली नसल्याचे पाहायला मिळत आहे. २९ सप्टेंबर २०१७ ला तत्कालीन एलफिन्स्टन स्थानकातील पादचारी पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीत २३ जणांचा मृत्यू, तर ३९ जण गंभीर जखमी झाले होते. त्यानंतर स्थानकांतील गर्दी व्यवस्थापनासाठी उपाययोजनांचा विचार सुरू झाला. याचाच भाग म्हणून आता फलाटांवरील दुकाने एका टोकाला हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रभादेवी स्थानकातील दुकाने हटविण्यात येणार आहेत.

मात्र, महिना उलटूनही काही दुकाने फक्त झाकून ठेवलेली आहेत. त्यामुळे प्रवाशांना याचा अपेक्षित फायदा होत नाही. दादर स्थानकातील फलाट क्रमांक १ वर एका बाजूला एक अशी दोन खाद्यपदार्थांची दुकाने आहेत. तसेच स्टेशनबाहेरील फेरीवाल्यांच्या गर्दीतून प्रवाशांना वाट काढत स्थानकात ये-जा करावी लागते. मालाड, कांदिवली आणि लोअर परळ स्थानकांतील गर्दी कमी करण्यासाठी सुशोभीकरण आणि पुनर्रचना कामे सुरू आहेत. मात्र, ही कामे अद्याप अपूर्ण असल्यामुळे प्रवाशांना फलाटांवर उभे राहणेही कठीण झाले आहे. त्यामुळे या सुधारणा केवळ दिखाऊ असल्याची टीका प्रवाशांकडून होत आहे.




### मध्य रेल्वेने आतापर्यंत ३० दुकाने हलविली

मध्य रेल्वेने सात स्थानकांवरील ३० दुकाने फलाटांच्या टोकाला हलविली आहेत. मात्र, प्रवाशांच्या मते, या निर्णयाचा प्रत्यक्ष फायदा कमीच झाला आहे. फलाटांच्या मध्यभागी होणारी गर्दी कायम आहे. फलाटांवरील जागा अपुरी असल्यामुळे चेंगराचेंगरीचा धोका आहे. रेल्वे प्रशासन प्रवाशांच्या सुविधेसाठी विविध योजना राबवत आहे. काही स्थानकांवर त्याची सुधारणा दिसत असली तरी अर्धवट कामांमुळे अपेक्षित परिणाम साधला गेलेला नाही.

**अंमलबजावणी अद्याप अपूर्ण :** फलाटांवर मध्यभागी असलेली दुकाने एका टोकाला नेण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी अपूर्ण आहे. काही ठिकाणी दुकाने हलविलेली नाहीत. तर काही ठिकाणी त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन केले गेलेले नाही. स्थानकांवर विविध सुधारणा करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे प्रवाशांना तात्पुरता त्रास सहन करावा लागत आहे. फलाटांवरील जागा अपुरी असल्यामुळे गर्दीच्या ताणाचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे ठोस उपयायोजनांची गरज व्यक्त होत आहे.

> फलाटांवरील दुकाने हलविण्याचा रेल्वेचा निर्णय स्वागताहार्य असला तरी प्रवाशांना त्याच हवा तास फायदा होत नाही. कुर्लासारख्या स्थानकाची अवस्था वाईट आहे. प्रशासनाने फलाटांवरील दुकाने स्थलांतरित करून त्यांच्यासाठी एखादे फूडकोर्ट तयार करणे आवश्यक आहे. गाड्यांचे आणि फलाटांची लांबी वाढवत असली तरी रुंदी तशीच राहते. त्यामुळे रेल्वेने सर्व खाद्यपदार्थांची दुकाने तसेच तिकीटघर डेकवर नेणे आवश्यक आहे.
>
> **- केतन शाह**, झेडआरयुसीसी

> फलाटांवरील स्टॉल, कॅन्टीन हलविण्याचा निर्णय चांगला आहे; पण स्टॉल हलविल्यानंतर रिकामी झालेली जागा फलाटाच्या समपातळीत आणणे गरजेचे आहे, तरच प्रवाशांना तेथे नीट उभे राहता येईल. फलाटांवरील वाढत्या गर्दीचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने रेल्वेला करता यायला हवे. रेल्वेने अशा उपाययोजना हाती घेताना त्याची कल्पना प्रवाशांना द्यावी. रेल्वेच्या अशा निर्णयाला विरोध नाही; पण त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने व्हावी.
>
> **- डॉ. रसिका वैद्य**, प्रवासी

# म्हाडा कोकण मंडळाच्या सोडतीसाठी अर्ज सादर करण्यास २४ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

म्हाडाच्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे २२६४ सदनिकांच्या विक्रीकरिता जाहीर सोडतीकरिता अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदारांना अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर यांनी दिली.

कोकण मंडळ सोडतीसाठी अर्ज भरणा प्रक्रियेला ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रारंभ करण्यात आला. मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत अर्जदार २४ डिसेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत सहभाग घेऊ शकतात. त्यानंतर सोडतीत सहभाग घेण्याची लिंक या प्रणालीवरून निष्क्रिय करण्यात येणार आहे. २६ डिसेंबर, २०२४ रात्री ११.५९ पर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील, तसेच २६ डिसेंबर, २०२४ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/NEFTद्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी ०८ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. १६ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता सोडतीत सहभाग घेणाऱ्या अर्जांची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

२१ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी १० वाजता पात्र अर्जांची संगणकीय सोडत काढली जाणार आहे. अर्जदारांना सोडतीचा निकाल तात्काळ मोबाईलवर एसएमएस द्वारे , ई-मेल द्वारे तसेच ॲपवर प्राप्त होणार आहे. या सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ५९४ सदनिका, १५ टक्के एकात्मिक गृहनिर्माण योजनेअंतर्गत ८२५ सदनिका, कोकण मंडळाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत विखुरलेल्या ७२८ सदनिका, रोहा-रायगड व ओरस सिंधुदुर्ग येथे ११७ भूखंड विक्रीसाठी उपलब्ध आहेत.


रेवती गायकर यांनी सांगितले की, राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू आचारसंहितेमुळे सोडतीविषयक प्रसार मोहीम राबविता आली नाही. त्यामुळे आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर मंडळातर्फे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर योजनेतील सदनिकांच्या विक्रीला प्रतिसाद वाढावा यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मंडळाने ठिकठिकाणी उभारलेल्या स्टॉल्सला आतापर्यंत सुमारे सहा हजार लोकांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली आहे. त्यापैकी ३०१ जणांनी सदनिका खरेदीसाठी विक्री किंमतही जमा केली असल्याचे श्रीमती गायकर यांनी सांगितले. २२६४ सदनिकांच्या विक्रीसाठी अर्ज करण्यास अर्जदारांना संधी मिळावी यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन गायकर यांनी केले आहे.

# पश्चिम रेल्वेची पेन्शनधारकांसाठी 'डिजिटल लाइफ सर्टिफिकेट' मोहीम सुरू

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

पश्चिम रेल्वेने अलीकडेच पश्चिम रेल्वेच्या विविध विभाग आणि युनिटमधील पेन्शनधारक/कौटुंबिक पेन्शनधारकांसाठी विशेष डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम ३.० सुरू केली आहे. पेन्शनधारकांना त्यांचे जीवन प्रमाणपत्र डिजिटल पद्धतीने सादर करण्याच्या सोयीसाठी आणि फायद्यासाठी विविध प्लॅटफॉर्म, पेन्शनर्स संघटना आणि सोशल मीडियावर या मोहिमेचा प्रचार केला जात आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, पेन्शनधारकांना पेन्शनचा लाभ घेण्यासाठी बँकांमध्ये जीवन प्रमाणपत्रासारखी महत्त्वाची कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तींना बँकेपर्यंत पोहोचण्यासाठी कागदोपत्री काही वेळा त्रासदायक आणि चिंताजनक प्रक्रिया असू शकते.

या प्रक्रियेत निवृत्तीवेतनधारकाला नोव्हेंबर महिन्यात एकदा बँकेत जाऊन तो जिवंत असल्याचा पुरावा म्हणून त्याचे जीवन प्रमाणपत्र सादर करावे लागते.पेन्शनधारक महिन्याच्या अखेरीस बँकेत जीवन प्रमाणपत्र सादर करू शकला नाही, तर त्याला कार्यालयात जाऊन पेन्शन सुरू करण्यासाठी दीर्घ प्रक्रियेतून जावे लागते. प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, पश्चिम रेल्वेने एक विशेष डीएलसी मोहीम सुरू केली, निवृत्तीवेतनधारकांना त्यांचे जीवन प्रमाणपत्र त्यांच्या घरी



बसूनच नियोजित तारखेपूर्वी सादर करण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूक केले. मुंबई सेंट्रल, वडोदरा, अहमदाबाद, रतलाम, भावनगर आणि राजकोट विभाग आणि पश्चिम रेल्वेच्या पाच युनिट्समध्ये कार्मिक विभागाच्या समन्वयाने लेखा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पूर्णवेळ डीएलसी मोहीम राबवली. निवृत्तीवेतनधारक/कौटुंबिक निवृत्तीवेतनधारकांना त्यांचे जीवन प्रमाणपत्र डिजिटल पद्धतीने सादर करणे सोपे आणि सुलभ बनवून, घटनास्थळाभोवती अनेक शिबिरे उभारण्यात आली आणि बँकांमध्ये सुविधा केंद्रे उभारण्यात आली.

# श्रींच्या मूर्तीला सिंदुर लेपन

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरातील "श्रीं"च्या मूर्तीला उद्यापासून ते १५ डिसेंबर, २०२४ या कालावधीत सिंदूर लेपन करण्यात येणार आहे. या कालावधीत भाविकांना श्रींच्या प्रत्यक्ष मूर्तीचे दर्शन घेता येणार नाही. परंतु श्रीं च्या प्रतिमूर्तीचे दर्शन भाविकांना दिले जाईल. (सोमवारी)१६ डिसेंबर, या दिवशी "श्रीं" च्या मूर्तीचे प्रोक्षणविधी, नैवेदय व आरती झाल्यानंतर दु. १.०० वाजता भाविकांना नेहमीप्रमाणे गाभाऱ्यातून श्रींचे दर्शन देण्यात येईल.



# बेस्टच्या बसचा एलबीएस मार्गावर 'भरधाव' थरार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



बेस्टची ही बस मार्केटमध्ये घुसल्याने तिने अनेकांना भरधाव वेगाने धडक दिली आहे. त्यामुळे काही जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. कुर्ला एलबीएस मार्गावर ही घटना घडली असून अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. यातील काहींची प्रकृती चिंताजनक आहे. अपघातात मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**५ जणांचा मृत्यू, १० जखमी**

भरधाव बेस्ट बस मार्केटमध्ये घुसल्याने ही भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव वेगाने मार्केटमध्ये घुसलेल्या बेस्ट बसने अनेकांना धडक दिली आहे. या घटनेनंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाली आहे. घटनेनंतर आता घटनास्थळी पोलीसही दाखल झाले आहेत.

घटनास्थळी मोठी गर्दी झाली आहे. पोलीसही घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी बेस्ट बसच्या चालकाला ताब्यात घेतले आहे. कामावरुन लोक घरी जाण्याच्या गडबडीत असताना बसने होत्याचे नव्हते केले. एलबीएस रोड हा अतिशय दाटीवाटीचा परिसर आहे. तिथे मार्केटसुद्धा आहे. असं असताना या परिसरात भरधाव बस चालवण्यात आली. भरधाव बेस्टने अनेक वाहनांना धडक दिली आहे. बेस्ट बसने दिलेल्या धडकेत रिक्षाचा चक्काचूर झालेला आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, बेस्ट बसचा चालक हा मद्यधुंत अवस्थेत होता. या अपघातात सात ते आठ जणांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेत अनेकांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेनंतर परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमा झाली आहे. घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठत गर्दीला बाजूला सारत बचावकार्याला सुरुवात केली आहे. जखमींना आणि मृतकांना तातडीने रुग्णालयात नेलं जात आहे. तसेच कुर्ला पोलीस या अपघात प्रकरणाचा सविस्तर तपास करत आहेत.

# परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अग्रेसर : राज्यपाल

◆ मुंबई (प्रतिनिधी) :



महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर औद्योगिक राज्य असून देशाच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पन्नामध्ये, राज्याचे १४ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान आहे. थेट परकीय गुंतवणुकीसाठी राज्याला अधिक पसंती मिळते. मागील आर्थिक वर्षामध्ये थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथमस्थानी होता. तसेच सन २०२४-२५ मध्ये एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत १,१३,२३६ कोटी रुपये इतक्या थेट परकीय गुंतवणुकीसह महाराष्ट्राने देशात पुन्हा अव्वल आला आहे. ही गुंतवणूक, मागील वर्षाच्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीच्या ९० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी सांगितले. राज्यपाल म्हणाले की, शेतकऱ्यांना शाश्वत सौर ऊर्जेवर आधारित सिंचन सुविधा पुरविण्यासाठी "मागेल त्याला सौर कृषी पंप योजना" सुरु केली आहे. "प्रधानमंत्री कुसुम" घटक-ब योजनेंतर्गत, एकूण ४ लाख ५ हजार सौर पंप बसविण्यास मान्यता देण्यात आली असून आतापर्यंत राज्यभरात १ लाख ८३ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०" सुरु केली आहे. या योजनेंतर्गत, ३५ हजार एकर शासकीय व खाजगी जमीनीवर १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प जून २०२६ पर्यंत उभारण्यात येणार आहे. राज्यातील ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचे कृषीपंप असलेल्या शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा करण्यासाठी "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४" सुरु केली आहे. यामुळे ४६ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. शासन राज्यात "प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट क्षेत्र विकास घटक २.० योजना" राबवित आहे. त्यामध्ये, ५ लाख ६५ हजार हेक्टर इतक्या क्षेत्राचा समावेश असून त्यासाठी एकूण १३३५ कोटी रुपये इतका खर्च होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यपालांनी २०२७-२८ या वर्षांपर्यंत एक ट्रिलीयन अमेरिकन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी महाराष्ट्राला देशातील पहिले राज्य बनवण्याचे अत्यंत महत्वकांक्षी लक्ष्य ठेवले असल्याचेही त्यांनी सांगितले. तर प्राधान्य क्षेत्रातील व उच्च तंत्रज्ञान आधारीत उत्पादन क्षेत्रातील सेमीकंडक्टर, विद्युत वाहने, अंतरिक्षयान व संरक्षण, रसायने व पॉलिमर, लिथीयम, आयर्न बॅटरी, पोलाद व इतर उत्पादने यांसारख्या प्रकल्पांना प्रणेता उद्योगांचा दर्जा देण्याचे आणि राज्यामध्ये अधिक गुंतवणूक आकर्षीत करण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्याचे धोरण सुद्धा जाहिर केले असल्याचे राज्यपालांनी सांगितले. शिवाय, या धोरणांतर्गत मागील आठ महिन्यांमध्ये मान्यता दिलेल्या प्रकल्पांमधून अंदाजे ३२९००० कोटी रुपये इतकी गुंतवणूक आकर्षीत होईल आणि त्यातून ११८००० इतके प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील असा विश्वास सुद्धा यावेळी राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात व्यक्त केला आहे. विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनाचा शेवटच्या दिवशी सायंकाळी ४ वाजता मध्यवर्ती सभागृहात राज्यापालांचे अभिभाषण झाले. या अभिभाषणात राज्यपाल राधाकृष्णन यांनी राज्य सरकारच्या कामगिरीची आढावा घेतला. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधिमंडळाचे सदस्य, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे आदी उपस्थित होते.

# मुंबईकरांची ट्रॅफिकमधून होणार सुटका

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

एमएमआरडीएने मुंबईतील सर्वात महत्त्वाच्या प्रकल्पाचा विस्तार केला आहे.कुर्ला ते बीकेसीपर्यंतच्या पॉड टॅक्सी प्रकल्प आता सायन रेल्वे स्थानकापर्यंत विस्तार करण्यात येण्याचा विचार आहे. मुंबईत बनणारी देशातील पहिली पॉड टॅक्सी प्रकल्पामुळं प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. काहींनी या प्रकल्पाबाबत सवाल उपस्थित केला आहे. पॉड टॅक्सीच्या प्रति किमी २१ रुपये भाडेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. पॉड टॅक्सीची अवस्थापण मोनो रेलप्रमाणेच होऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. बीकेसीत मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होते. तसंच, इथे मोठं मोठी कार्यालये आणि कॉर्पोरेट ऑफिस असल्याने ऑफिसात पोहोचण्यासाठी वेळ लागतो. तसंच, रिक्षा आणि कॅबसाठीही अतिरिक्त पैसे मोजावे लागतात.पंधरा ते वीस मिनिटांच्या प्रवासासाठी पाउण तास लागतो. त्याचमुळं प्रशासनाने पॉड टॅक्सीची घोषणा केली आहे. या पॉड टॅक्सीमुळं प्रवास सोप्पा होणार आहे.

पॉड टॅक्सीचा पहिला टप्पा वांद्रे ते कुर्ला उपनगरीय रेल्वे स्थानकांना जोडला जाणार आहे. प्रत्येक रेल्वे स्थानकाला लागून दोन मुख्य टर्मिनल असतील ज्यात प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, ओएनजीसी बिल्डिंग, गोदरेज बीकेसी, जिओ वर्ल्ड सेंटर, भारत डायमंड बोर्स, सेबी, एनएसई, फॅमिली कोर्ट आणि कलानगर जंक्शन यासह इतर अधिक ठिकाणांशी जोडलं जाणार आहे. पॉड टॅक्सीचा पहिला टप्पा २०२७ पर्यंत वाहतूक सेवेत दाखल करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. तर, बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा १३.५ किमीने पॉड टॅक्सीचा दुसऱ्या टप्पअंतर्गत विस्तार केला जाणार आहे. १६ स्थानकांचा हा विस्तारित मार्ग २०४१ पर्यंत कार्यान्वित केला जाणार आहे.

## ऑपरेशन अमानत अंतर्गत प्रवाशांचे हरवलेले सामान परत मिळवून दिले

# 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'अंतर्गत हरवलेल्यांची सुटका

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) ला रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. "ऑपरेशन नन्हे फरिश्ते" अंतर्गत मुलांना वाचवण्याची जबाबदारीही ते पार पाडत आहे. जानेवारी ते नोव्हेंबर-२०२४ या कालावधीत, मध्य रेल्वेच्या आरपीएफने शासकीय रेल्वे पोलीस आणि इतर फ्रंटलाइन रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने एकूण १०९९ मुलांची ७४० मुले आणि ३५९ मुली सुटका केली आणि त्यांना त्यांच्या कुटुंबियांशी जोडले.



यामध्ये चाइल्डलाइन सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्यांच्या पालकांशी पुनर्मिलन झालेल्या मुला-मुलींचा समावेश आहे.

जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेवरील सुटका, पुनर्मिलन करण्यात आलेल्या मुलांचे विभागनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**पुनर्मिलन करण्यात आलेली मुले:**

मुंबई विभाग - ३७९ मुले (२४२ मुलगे आणि १३७ मुली)
भुसावळ मंडळ - २४७ मुले (१४१ मुलगे व १०६ मुली)
पुणे विभाग -२४६ मुले (२११ मुलगे आणि ३५ मुली)
नागपूर विभाग - १६८ मुले (१०७ मुलगे व ६१ मुली)
सोलापूर मंडळ - ५९ मुले (३९ मुलगे व २० मुली)

# सीमावासीयांच्या पाठीशी महाराष्ट्र खंबीरपणे उभा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

विधिमंडळाच्या तीनदिवसीय अधिवशेनाचा आज शेवटचा दिवस होता. यावेळी राज्यपालांच्या अभिभाषणानंतर विधान परिषदेची विशेष बैठक झाली. यावेळी विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बेळगाव कारवार संबंधी महत्त्वाचा मुद्दा मांडला. "बेळगाव कारवार प्रश्नी आपण मराठी माणसाला न्याय द्यावा, सभागृहामध्ये मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी बेळगाव कारवार हे केंद्रशासित प्रदेश करावा असा ठराव विधिमंडळाने घ्यावा आम्ही एक मताने या ठरवास पाठिंबा देऊ", अशी विनंती यावेळी विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "बेळगावमध्ये सीमा भागातील आपल्या मराठी भाषिकांवर अन्याय होतोय त्यांचा जो मराठी भाषिक महामेळावा आयोजित केला होता त्याला कर्नाटक सरकारने विरोध केला. मेळावा मोडून काढण्यासाठी कार्यकर्त्यांची धरपकड केली आणि महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांना अटक करून वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये स्थानबद्ध केलं. ज्या ठिकाणी मेळावा होता त्या ठिकाणी १४४ कलम देखील लागू करून धर्मवीर संभाजी चौकातील महाराजांच्या पुतळ्यासमोर जाणाऱ्यांना मज्जाव देखील केलेला आहे आणि खरं म्हणजे मराठा भाषिक मेळावा या मोडून काढण्यासाठी पोलिसांचा अत्याचार सुरू आहे . बेळगावचे माजी महापौर मनोहर किनीकर, माजी आमदार दिगंबर पाटील, माजी महापौर बालाजी अष्टीकर, प्रकाश मरगळे हे सर्व या क्षणाला स्थानबद्ध आहेत आणि म्हणून कर्नाटक सरकारच्या या अन्यायाचा महाराष्ट्र सरकार तीव्र शब्दात निषेध करत आहे.



**डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली तत्काळ दखल**




ईश्वर अय्यर, मुख्य वित्तीय अधिकारी, इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट (इंडिया) लिमिटेड, तेहमास्प नरिमन प्रिंटर, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूट (इंडिया) लिमिटेड, आयपीओ पत्रकार परिषदेत प्रतीक रुंगटा, व्यवस्थापकीय संचालक,ब्लॅकस्टोन .

**सुविचार** - वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे.


## दुसऱ्या डावाची सुरुवात...!

नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी, अध्यक्षांची निवड आणि राज्यपालांचे अभिभाषण असा तीन दिवसांचा कार्यक्रम विधानसभेच्या छोटेखानी अधिवेशनात होता. त्यापैकी उत्सुकता केवळ विधानसभा अध्यक्षांच्या निवडीची होती. महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठे बहुमत मिळाल्यामुळे विधानसभा अध्यक्ष बिनविरोध निवडले जातील हे अपेक्षित होतेच, फक्त या पदावर कुणाची निवड केली जाते, हाच काय तो उत्सुकतेचा विषय होता. अध्यक्षपद हे अतिशय मानाचे पद आहे, शिवाय सभागृहाच्या संचालनात त्यांच्याकडे भरपूर अधिकार असतात. कामकाजासंदर्भात त्यांच्या निर्णयांना केवळ सर्वोच्च न्यायालयातच आव्हान देता येते आणि बरेचदा सर्वोच्च न्यायालय देखील अध्यक्षांच्या निर्णयात हस्तक्षेप करत नाही. मागच्या कार्यकाळात असे प्रकरण उपस्थित झाले होते आणि त्यावेळी तत्कालिन अध्यक्षांनी दिलेल्या निवाड्यावर सर्वोच्च न्यायालयाने अजूनही आपला निवाडा दिलेला नाही. आता ती विधानसभाच बरखास्त झाल्याने त्या प्रकरणाशी संबंधित निवड्यांना तसा अर्थ उरलेला नाही. एकूणच विधानसभा अध्यक्षांचे अधिकार आणि महत्त्व मागच्या कार्यकाळात विशेषत्वाने अधोरेखित झाले. अर्थात त्यावेळी विधासभेतील पक्षीय बलाबल पाहता विधानसभा अध्यक्षपद खूप कळीचे ठरणार होते. त्यामुळेच नाना पटोले यांनी विधानसभेचे अध्यक्षपद सोडले नसते तर आमचे सरकार गेले नसते असे महाविकास आघाडीचे नेते नेहमीच म्हणत आले आहेत. यावेळी तशी काही परिस्थिती नाही. महायुतीकडे प्रचंड संख्याबळ आहे. त्यामुळे या कार्यकाळात विधानसभा अध्यक्षांना आपले खास अधिकार वापरण्याची संधी मिळण्याची शक्यता खूप कमी आहे. अर्थात विधानसभा अध्यक्षांना मान आणि अधिकार मोठा असला तरी सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही आमदाराला या पदात स्वारस्य नसते. सगळ्यांची नजर मंत्रीपदावर असते. त्यामुळेच यावेळी अध्यक्षपदी कुणाची वर्णी लागते, याची उत्सुकता होती. राहुल नार्वेकर यांनी मागच्या वेळी आपले सगळे वकिली कसब पणाला लावीत महायुती सरकारवरील संकट दूर सारले होते. परंतु यावेळी त्यांची पुन्हा त्या पदावर येण्याची इच्छा नव्हती, त्यांची नजर मंत्रीपदावर होती. अप्रत्यक्षरित्या त्यांनी तसे बोलूनही दाखवले होते. परंतु यावेळी इतर कुणाच्या इच्छेला तसे महत्त्व राहिलेले नाही. बहुतेक सगळे अधिकार फडणवीस यांच्या हातात केंद्रित झाले आहेत. त्यामुळे या पुढच्या काळात किमान राज्याच्या राजकारणात तरी फडणवीस म्हणतील तीच पूर्व दिशा अशी परिस्थिती राहणार आहे. राहुल नार्वेकर यांची मंत्री पदाची इच्छा फडणवीस यांना कदाचित मान्य नसावी किंवा विधानसभेच्या अध्यक्षपदी त्यांच्यासारखाच खमका आणि वकिली डावपेचात तरबेज माणूस हवा असा असे फडणवीसांना वाटले असावे. त्यामुळे महायुतीकडून विधानसभेच्या अध्यक्ष पदासाठी राहुल नार्वेकर यांनाच अर्ज करण्यास सांगण्यात आले. त्यांच्या विरोधात कोणाचाही अर्ज न आल्याने नार्वेकर यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. तसेही विधानसभेचा अध्यक्ष बिनविरोध निवडला जाण्याची परंपरा महाराष्ट्रात आहेच. क्वचित प्रसंगी या परंपरेला छेद मिळाला असला तरी तो त्यावेळी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये असलेल्या संख्याबळाच्या गणितामुळे दिल्या गेला होता. यावेळी संख्याबळ हा विषयच कुचकामी ठरला आहे. पक्षाने आदेश दिल्यानंतर नार्वेकर यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. विधानसभेचे अध्यक्षपद भाजप आपल्याकडेच ठेवणार हे स्पष्टच होते. कदाचित विधान परिषदेचे सभापती पदही भाजप आपल्याकडेच ठेवण्याची शक्यता आहे. राहुल नार्वेकरांचा दुसरा डाव सुरु झाला आहे, त्यासोबतच महाराष्ट्र विधानसभेचा नवा डाव देखील सुरु झाला आहे. जयंत पाटील म्हणाले त्याप्रमाणे कोणी योग्यवेळी योग्य निर्णय घेतला नाही तर हा डाव एकसुरी आणि काहीसा कंटाळावा ठरणार आहे. विरोधकांनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला असला तरी हा संघर्ष सभागृहात पाहायला मिळेल त्याची शक्यता तशी कमीच दिसते. एक तर अतिशय तोकडे संख्याबळ आणि दुसरे म्हणजे विरोधी बाकांवरील अनेक आमदारांच्या मनात सुरू असलेली चलबिचल. विरोधी आमदारांच्या मनातील या अस्वस्थतेचा प्रत्यय जयंत पाटलांच्या वक्तव्यातून आलेला आहेच. त्यामुळे निकट भविष्यात हा दुसरा डाव एकतर्फी खेळल्या जाण्याची शक्यता अधिक आहे.

## रिझर्व्ह बँकेला लाभले नवे गव्हर्नर...!

गेल्या सहा वर्षांपासून रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून काम पाहणारे शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ संपल्यानंतर आता त्यांच्या जागी रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची निवड करण्यात आली आहे. बुधवारपासून पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. कॅबिनेटच्या समितीने महसूल सचिव पदी असलेल्या संजय मल्होत्रा यांची निवड रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी केली आहे. संजय मल्होत्रा हे १९९० च्या राजस्थान कॅडरचे IAS अधिकारी आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये ते आरईसीचे चेअरमन आणि एमडी या पदावर नियुक्त झाले. त्याआधी ते उर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव पदावर कार्यरत होते. २०२२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेसचे सचिव या पदावर ते कार्यरत होते. आतापर्यंत रिझर्व बँकेचे गव्हर्नर पद सांभाळणाऱ्या शक्तिकांत दास यांचा दीर्घ कालावधी फारसा वादग्रस्त ठरला नसला तरी केंद्र सरकारच्या मर्जीने काम करणारे गव्हर्नर हीच त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. यापूर्वीच्या काळात रघुराम राजन यांनी गव्हर्नर म्हणून काम करताना आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. सरकारच्या दबावापुढे न झुकता आर्थिक दृष्ट्या योग्य ठरतील असेच निर्णय ते घेत असत, परंतु पुढच्या काळात केंद्र सरकारने आपल्या मर्जीनुसार काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची या पदावर वर्णी लावली. शक्तीकांत दास त्याला अपवाद नव्हते. या पृष्ठभूमीवर संजय मल्होत्रा आपल्या पूर्वसुरींच्या पावलावर पाऊल ठेवून काम करतात की रघुराम राजन यांचा आदर्श आपल्यासमोर ठेवतात, हे येत्या काळात दिसून येईलच. पुढील तीन वर्षांसाठी ते या पदावर कार्यरत असतील.सध्या ते अर्थ मंत्रालयात सचिव (महसूल) म्हणून कार्यरत होते. त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत वित्तीय सेवा विभागात सचिवपद भूषवले होते. संजय मल्होत्रा यांना राज्य आणि केंद्र सरकारमधील वित्त आणि कर आकारणी या क्षेत्राचा मोठा अनुभव आहे. त्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांच्या संदर्भात कर धोरण तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्याकडे अनुभव दांडगा आहे, फक्त सरकारचा दबाव झुगारण्याची इच्छाशक्ती आहे की नाही हाच केवळ एक मुद्दा आहे.

### स्थित्यंतर



राही भिडे
9867521049

## आले पुन्हा परतुनी 'देवा राज'

नागपूरला १६ तारखेपासून हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. त्या आधी मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप होईल. खातेवाटप हा कळीचा मुद्दा असून गृह खाते मिळावे यासाठी शिंदे गट अडून बसला. परंतु भाजप ते द्यायला तयार नाही. गृह, ऊर्जा, गृहनिर्माण ही खाती भाजप सोडायला तयार नाही. महसूल, जलसंपदा, रस्ते बांधणीसारख्या तीन पर्यायांपैकी एक पर्याय शिंदे यांना निवडावा लागणार आहे. मुख्यमंत्री राहिलेल्या शिंदे यांची कोंडी होत असली, तरी त्यांचा अवमान न करता त्यांना बरोबर घेऊन जाण्याची कसरत देवाभाऊंना करावी लागणार आहे.

महाराष्ट्राच्या निवडणुकीनंतर दहा दिवस चाललेला गोंधळ अखेर संपला. धक्कातंत्र वापरण्याचा निर्णय घेतलेल्या भाजपच्या दिल्लीतील नेत्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघापुढे अखेर नमते घ्यावे लागले आणि महाराष्ट्रात देवाराज पुन्हा आले. महायुतीसमोर महा विकास आघाडी निष्प्रभ ठरली असल्याचे दिसताच ईव्हीएम मशीनबाबत शंका व्यक्त करण्यात आली. कोणालाच वाटले नव्हते भाजप सत्तेत येईल. पण सत्ता आली, बहुमताने आली मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या डोक्यावर आव्हानांचे ओझे घेऊन आली. त्यांच्या बरोबर किती आमदार आहेत, हे स्पष्ट झाले असताना भाजपने इतके दिवस नेता निवडीचा घातलेला घोळ शोभादायक नव्हता. खातेवाटप आणि मंत्र्यांची निवड यावरूनही रस्सीखेच सुरू झाली. मात्र मुख्यमंत्रीपदाचा पूर्वानुभव असल्याने अनेक आव्हानांवर ते मात करतील, यात शंका नाही.

विधानसभा निवडणुकीत भाजपने स्वबळावर १३२ जागा जिंकल्या. हा आकडा इतका शक्तिशाली आहे, की एकाच वेळी अनेक विक्रम नोंदवले गेले. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. मोठी गोष्ट म्हणजे महायुतीचे दोन मोठे चेहरे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनाही सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घ्यावा लागला. अजितदादांनी लगेच फडणविसांना पाठींबा जाहीर केला, शिंदे यांनी मात्र आढेवेढे घेतले, थेट दरेगाव गाठले. सहा महिन्यांसाठी का होईना त्यांना मुख्यमंत्री व्हायचे होते, परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची नाराजी भाजपला परवडणारी नव्हती. आणि इतकी चांगली संधी भाजपला यापुढे मिळेल, की नाही हे येणारा काळ ठरवणार आहे. शिंदे यांची उपमुख्यमंत्री होण्याची इच्छा नव्हती; परंतु त्यांच्या आमदारांनीच त्यांच्यावर इतके दडपण आणले, की त्यांना त्याशिवाय पर्याय राहिला नाही. सत्तेत सहभागी झाले नाही, तर पक्षफुटीचा धोका होताच. शेवटी त्यांनी नमते घेतले आणि आता महायुती पूर्णपणे एकवटल्याचे दिसत आहे;

महाराष्ट्राच्या निकालातून एक मोठा संदेश दिसू शकतो. लोकसभा निवडणुकीच्या वेळी २४० जागांवर घसरलेल्या भाजपच्या मोदी-शाह जोडीबद्दल असे बोलले जात होते, की ते आता इतके ताकदवान नाहीत; परंतु काही महिन्यांतच समीकरणे पूर्णपणे बदलली. हरियाणामध्ये सरकार स्थापन झाले आहे, जम्मू-काश्मीरमध्ये कामगिरी पूर्वीपेक्षा चांगली झाली आहे आणि महाराष्ट्रात मोठा जनादेश मिळाला आहे. जेव्हा कोणी हवेत खूप उडते, तेव्हा त्याला जमिनीवरील वास्तव सांगण्यास थोडा वेळ लागतो. भाजपने शिंदे यांना अशीच वास्तव समजण्याची संधी दिली. 'एनडीए'सोबत राहणे हाच त्यांचा सर्वोत्तम पर्याय असेल याची त्यांना जाणीव झाली. मुंबईतून आणखी एक मोठा संदेश गेला आहे. राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये घवघवीत विजय मिळवल्यानंतर, भाजपने धक्कातंत्र वापरून फारसे कुणाला माहीत नसलेल्या चेहऱ्यांना मुख्यमंत्रीपदी नियुक्त करून सर्वांना आश्चर्यचकित केले. एकीकडे छत्तीसगडमध्ये रमण सिंह हे अधिक शक्तिशाली नेते मानले जात होते, तर राजस्थानमध्ये वसुंधरा राजे यांचा प्रभाव, मध्य प्रदेशात शिवराज सिंह यांच्या लोकप्रियता यामुळे सत्ता मिळाली; पण मोदी-शाह जोडीने या तिन्ही राज्यांमध्ये भविष्यातील नेतृत्व तयार होऊ शकेल असे चेहरे निवडले. महाराष्ट्रातही हे धक्कातंत्र वापरण्याचा मोदी-शाह यांचा प्रयत्न होता; परंतु संघाला कोणत्याही परिस्थितीत देवेंद्रांनाच मुख्यमंत्री करायचे होते. फडणवीस यांचा राज्याभिषेक झाल्यामुळे भाजपला सर्वाधिक लोकप्रिय चेहऱ्याची गरज असल्याचे दिसून आले. एक तर पवार आणि शिंदे यांच्यासारखे बलाढ्य नेते महाआघाडीत असताना भाजपला सुरक्षितपणे सरकार चालविण्यासाठी फडणवीस यांच्यासारख्या कार्यशैलीची गरज होती. देवेंद्र यांच्या हाती राज्यशकट आला असला, तरी त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे काम करण्यात अडचणी आहेत. मुख्यमंत्रिपदी निवड झाल्यानंतरच्या पहिल्याच बैठकीत त्यांनी सारे काही मनासारखे होत नसते, काही तडजोडी कराव्या लागतात, त्याग करावा लागतो, असे सांगितले. मागच्या अडीच वर्षांपूर्वी देवाभाऊंना त्याग करावा लागला होता. आता ते कुणाकुणाला त्याग करायला लावतात, याची धास्ती अनेक आमदारांना आहे. त्यातही भाजपच्या आमदारांपेक्षा ही धास्ती शिंदे गटाच्या आमदारांत जास्त आहे. शाह यांनी मागच्या सरकारमधील मंत्र्यांचे आणि आमदारांचेही रिपोर्ट कार्ड मागितले होते. देवेंद्र यांनी ते पोचवले. ज्यांच्यावर आरोप आहेत, अशा मंत्र्यांना डच्चू दिला जाऊ शकतो. त्यामुळे शिंदे गटाने आमचे मंत्री निवडण्याचाही अधिकार भाजपला दिला का, असा संतप्त सवाल केला होता. देशात मित्रपक्षांना संपवण्याचा भाजपचा पूर्वइतिहास पाहता कदाचित ही वेळ शिंदे यांच्या पक्षाचीही असू शकते. नागपूरला १६ तारखेपासून हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. त्या आधी मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटप होईल. खातेवाटप हा कळीचा मुद्दा असून गृह खाते मिळावे यासाठी शिंदे गट अडून बसला. परंतु भाजप ते द्यायला तयार नाही. गृह, ऊर्जा, गृहनिर्माण ही खाती भाजप सोडायला तयार नाही. महसूल, जलसंपदा, रस्ते बांधणीसारख्या तीन पर्यायांपैकी एक पर्याय शिंदे यांना निवडावा लागणार आहे. मुख्यमंत्री राहिलेल्या शिंदे यांची कोंडी होत असली, तरी त्यांचा अवमान न करता त्यांना बरोबर घेऊन जाण्याची कसरत देवाभाऊंना करावी लागणार आहे. मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युल्यानुसार, भाजपला २०-२२ शिवसेनेला ११-१२ तर राष्ट्रवादी काँग्रेसला आठ-दहा मंत्रिपदे मिळू शकतात. महायुती सरकारने अद्याप तीन भागीदारांमध्ये नेमका सत्तावाटपाचा फॉर्म्युला निश्चित



केलेला नसल्यामुळे गृह, महसूल, नगरविकास, पाटबंधारे, सामाजिक न्याय या खात्यांवरून महायुतीच्या तिन्ही नेत्यांमध्ये खडाजंगी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंत्रिमंडळाची सर्व पदे एकाचवेळी भरली जातील की दोन ते तीन टप्प्यांत विस्तार होणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. महाराष्ट्रातील एकूण मंत्र्यांची संख्या ४३ असू शकते; परंतु महायुतीचे सरकार सर्व ४३ मंत्री बनवेल, की पूर्वीसारखे २९ जणांचे मंत्रिमंडळ असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. गृह, महसूल, शहरी विकास, पाटबंधारे, वन, वाहतूक, उच्च आणि तांत्रिक शिक्षण आणि गृहनिर्माण या महत्त्वाच्या खात्यांव्यतिरिक्त, भाजपने सांस्कृतिक, आदिवासी विकास, सामान्य प्रशासन, कायदा आणि न्यायव्यवस्था आणि माहिती तंत्रज्ञान (आयटी) सारखे विभाग कायम ठेवण्याची योजना आखली आहे. अर्थखाते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे ठेवण्याबाबत साशंकता दिसत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसला सहकार, कृषी, अन्न व नागरी पुरवठा, बंदरे, मदत व पुनर्वसन, सिंचन, सामाजिक न्याय आणि महिला व बालविकास ही खाती हवी आहेत. हे असे विभाग आहेत, ज्यांचा सार्वजनिक संपर्क आहे आणि ते ग्रामीण मतदारांशी जोडलेले आहेत. हे विभाग पक्षाचा मुख्य आधार आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांना ते मुख्यमंत्री असताना भाजपकडे असलेली सर्व नऊ मंत्रालये आपल्याकडे ठेवायची आहेत. शिंदे मुख्यमंत्री असताना भाजपला ही सर्व मंत्रिपदे मिळाली होती. भाजपला मुख्यमंत्रिपद मिळाल्याने तेव्हा शिवसेनेलाही त्याच प्रमाणात महत्त्वाची खाती मिळायला हवीत, असे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना वाटते;परंतु त्याला भाजप तयार नाही. गेल्या वेळेपेक्षा २७ जादा आमदार तसेच अपक्षांचा पाठिंबा असताना भाजप आता नमते घेणार नाही. या पार्श्वभूमीवर खातेवाटप ही देवाभाऊंपुढे मोठी कसोटी आहे.

### सरळ-सरळ



राजेश राजोरे
9822593903

## मानवी हक्क दिन : हक्कांची जाणीव आवश्यक

सर्वांगिण विकास व्हावा, कुणाला हीन लेखू नये, नैसर्गिक अधिकार प्राप्त व्हावेत, सन्मानाने जगण्याचा हक्क अबाधित रहावा, वगैरे उदात्त हेतुने हे मानवी हक्क प्रदान झाले आहेत. मात्र या सोबत वैयक्तिक व सामूहिक कर्तव्य पण करावयाची असतात. परंतु हक्काची जाणीव ठेवणे आणि कर्तव्य व जबाबदारीचे सोईस्करपणे विस्मरण किंवा दुर्लक्ष करणे, ही प्रवृत्ती स्वतःला व इतरांना योग्य रितीने जगू देत नाही. हे समजून घेणे आवश्यक ठरते.

**हक की लडाई तन्हा ही लडनी पडती है**
**सैलाब उमडता हैं जीत जाने के बाद...**

आज १० डिसेंबर जगभरात दरवर्षी साजरा होणारा मानवी हक्क दिन. १० डिसेंबर १९४८ रोजी युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीत या दिनाची घोषणा करण्यात आली. सर्व मानवांच्या प्रतिष्ठेला ओळखून आणि त्यांचे सरंक्षण मानवी हक्क करतात. तेव्हा मानवी हक्क वापरताना इतरांच्या हक्कांचा आदर केला पाहिजे, असा सूर या दिनानिमित्त काढला जातो.

सर्व व्यक्ती मानव म्हणून समान आहेत. आणि प्रत्येक मानवी व्यक्तीच्या अंगभूत प्रतिष्ठेमुळे वंश, रंग, लिंग, वय, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर मत, राष्ट्रीय किंवा सामाजिक मूळ, दिव्यांगत्व, मालमत्ता, जन्म किंवा इतर स्थिती, यासारख्या कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय सर्व मानवांना त्यांचा मानवी हक्कांचा हक्क आहे. असे मानवाधिकार सारख्या संस्थांनी स्पष्ट केले आहे. प्रत्येक व्यक्ती आणि सर्व लोकांना नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये सक्रिय, मुक्त आणि अर्थपूर्ण सहभाग, योगदान आणि आनंद घेण्याचा अधिकार आहे, ज्याद्वारे मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त केले जाऊ शकतात. राज्ये आणि इतर कर्तव्यधारकांनी मानवी हक्क साधनांमध्ये समाविष्ट केलेल्या कायदेशीर नियमांचे आणि मानकांचे पालन करणे आवश्यक आहे.

जगातील प्रत्येक व्यक्तीला जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता, कोर्ट सुनावणीचा अधिकार, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य हे पाच मानवी हक्क प्रमुख हक्क मानले जातात. हे मानवी हक्क जागतिक असून सर्वांना समान असतात. तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क उच्चायुक्त कार्यालय व मानवी हक्क समिती ह्या दोन संस्था जागतिकस्तरावर मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करतात. कारण हे हक्क मूलभूत मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी आहेत. तर मानवांना आधार देतात. अन्न, पाणी, हवा आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. याशिवाय मानव जगू शकत नाही.

मानवी हक्कांच्या प्रकारात सामाजिक किंवा नागरी मानवी हक्क यामध्ये १) जीवन, स्वातंत्र्य आणि सुरक्षिततेचा अधिकार, २) गुलामगिरीतून स्वातंत्र्याचा अधिकार, ३) अत्याचार किंवा क्रूर, अमानुष किंवा अपमानास्पद वागणूक किंवा शिक्षेपासून स्वातंत्र्याचा अधिकार, ४) गोपनीयता, कुटुंब, घर किंवा पत्रव्यवहार यामध्ये अनियंत्रित हस्तक्षेप करण्यापासून स्वातंत्र्याचा अधिकार, ५) लग्न करण्याचा आणि कुटुंबाचा हक्क आणि मालमत्तेचा अधिकार यांचा समावेश आहे.

राजकीय मानवी हक्क यामध्ये १) राष्ट्रीयत्वाचा अधिकार २) कायद्यासमोर समानतेचा अधिकार आणि कायद्याचे समान संरक्षण ३) न्यायिक उपायांचा अधिकार निष्पक्ष खटला आणि मनमानी अटक, अटकेपासून किंवा निर्वासन पासून स्वातंत्र्य, ४) विचार, अभिव्यक्ती, श्रध्दा, विवेक आणि धर्म स्वातंत्र्याचा अधिकार ५) शांततापूर्ण संमेलन आणि संघटनेच्या स्वातंत्र्याचा अधिकार ६) सरकारी कामकाजात भाग घेण्याचा अधिकार आणि सार्वजनिक सेवेत समान प्रवेश ७) समान मताधिकाराचा हक्क ८) चळवळीचे स्वातंत्र्य आणि आश्रय घेण्याचा अधिकार यांचा समावेश होतो.

आर्थिक मानवी हक्कांमध्ये १) सामाजिक सुरक्षा २) काम करण्याचा आणि समान कामासाठी समान वेतनाचा ३) कामगार संघटना स्थापनेचा ४) विश्रांतीचा अधिकार ५) अन्न, आरोग्य आणि पुरेशा जीवनमानाचा अधिकार येतो.

सांस्कृतिक मानवी हक्कांमध्ये विविध संस्कृती, रीतिरिवाज आणि परंपरांचे संरक्षण सोबतच १) समाजाच्या सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा २) कलेचा आनंद घेण्याचा आणि वैज्ञानिक प्रगती आणि त्याचे फायदे यामध्ये सहभागी होण्याचा अधिकार प्रामुख्याने सर्वांना मिळतो.

सर्वांगिण विकास व्हावा, कुणाला हीन लेखू नये, नैसर्गिक अधिकार प्राप्त व्हावेत, सन्मानाने जगण्याचा हक्क अबाधित रहावा, वगैरे उदात्त हेतुने हे मानवी हक्क प्रदान झाले आहेत. मात्र या सोबत वैयक्तिक व सामूहिक कर्तव्य पण करावयाची असतात. परंतु हक्काची जाणीव ठेवणे आणि कर्तव्य व जबाबदारीचे सोईस्करपणे विस्मरण किंवा दुर्लक्ष करणे, ही प्रवृत्ती स्वतःला व इतरांना योग्य रितीने जगू देत नाही. हे समजून घेणे आवश्यक ठरते.


शेवटी कोणी व्यक्ती आपल्या हक्काने वंचित राहते तेव्हा ती व्यक्ती मानवी हक्काने न्याय मागू शकते या आशयाच्या ह्या ओळी आठवतात...

**जब कोई मजबूर इंसान**
**नही पाता है अधिकार,**
**तब उसका अधिकार दिलाने**
**उठ खडा होता है मानवाधिकार...**

(लेखक हे दैनिक देशोन्नतीच्या बुलडाणा आवृत्तीचे संपादक आहेत.)

**खामगाव, जि. बुलडाणा**

### वर्तमान



श्याम ठाणेदार
9922546295

## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक!

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यूदेखील रस्ते अपघातात झाला आहे. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात.

नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

दौंड, जि. पुणे

### वाचक विचार मंच

## देशातील नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होणार

केंद्रीय गृह मंत्रालयाने संसदेत दिलेल्या माहितीप्रमाणे गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यासह देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त झाले आहेत. अजूनही देशात ११ राज्यांमधील ३८ जिल्हे नक्षल प्रभावित असून बहुसंख्य जिल्हे हे बिहार, झारखंड, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यातील आहेत. २०१० च्या तुलनेत २०२३ मध्ये नक्षल संबंधित हिंसक घटनांची संख्या ७३ टक्क्यांनी कमी झाली आहे. देशात २०१० मध्ये नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या १२६ होती. २०१८ मध्ये ती संख्या घटून ९० तर जुलै २०२१ मध्ये ७० झाली आणि एप्रिल २०२४ मध्ये ३८ जिल्ह्यांपर्यंत कमी झाली आहे. नक्षलवाद समस्येचे मुळासकट निराकरण करण्यासाठी २०१५ मध्ये 'राष्ट्रीय धोरण आणि नक्षलवादाला संबोधित करण्यासाठी कृती योजना' मंजूर करण्यात आली. त्यात सुरक्षा संबंधित उपाय, विकास योजना, स्थानिक समुदायांचे हक्क इत्यादींचा समावेश असलेले बहुआयामी धोरण आखण्यात आले. नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विविध विकास योजनांसाठी गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात ४३५०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या भागात १४५२१ किलोमीटरचे रस्ते, दूरसंचारसाठी ६५२४ टॉवर, ५७२१ पोस्ट कार्यालये, १००७ बँकेच्या शाखा आणि ९३७ एटीएम तसेच ४६ जिल्ह्यांत ४९ कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यात आली. परिणामी स्थानिकांना लाभलेल्या विकासाच्या नव्या संधी आणि रोजगारामुळे नक्षलवादाचे समूळ उच्चाटन होण्यास मदत होत आहे, ही अत्यंत जमेची बाजू आहे.

**प्रदीप शंकर मोरे**
मो.नं.: ९८७०७७७२७४

**तक्रार**
-----

बॅलेटजवळ तक्रार
करीत होती ईव्हीएम
म्हणे माझ्यावर संशय
घेतला जातो कायम

हरणारे काढतात
माझ्याविरूध्द गळा
त्यांना नेहमी वाटते
मी करते घोटाळा

त्यावर म्हणालं बॅलेट
मी सांगतोय पुन्हा पुन्हा
जोवर पकडल्या जात नाही
तोवर मानत नसतात गुन्हा

असे आरोपांचे फटाके
निकालानंतर फुटतात
पण अट्टल गुन्हेगारही
पुराव्याअभावी सुटतात

जेव्हा तुझ्या गळ्यात येईल
तेव्हा हो माफीचा साक्षीदार
अन् बिनधास्त सांगून टाक
कोण पडद्यामागचा सूत्रधार

ॲड. अनंत खेळकर , अकोला

### संवाद

## अन् जगायचं राहून गेलं!

माणूस जन्माला येतो, तेव्हा त्याचं आयुष्य कोऱ्या पाटीसारखं असतं. जस-जसा तो मोठा होतो, तसं आयुष्याचं एक चित्र त्याच्यासमोर आकार घेतं. मात्र, या चित्रात रंग भरताना त्याच्या हातून बरंच काही गमावलं जातं. आणि जेव्हा तो थांबून मागे वळून पाहतो, तेव्हा त्याला जाणवतं, 'अन् जगायचं राहून गेलं!'

आजच्या जगात प्रत्येकजण एका धावपळीच्या शर्यतीत अडकलेला आहे. शिक्षण, नोकरी, पैसा, आणि समाजातलं स्थान मिळवण्यासाठी आपण सतत झटत असतो. या प्रवासात आयुष्याचं खऱ्या अर्थाने जगणं कुठेतरी हरवतं. साध्या गोष्टींमधला आनंद शोधायचं विसरून, आपण मोठ्या गोष्टींच्या मागे धावतो.

आपल्याला लहानपणापासून शिकवलं जातं की, यश मिळवलं की आयुष्य परिपूर्ण होतं. पण यश मिळवल्यानंतरही मनात निर्माण होणारी पोकळी कशामुळे असते? कारण आपण आयुष्याकडे फक्त यशाच्या चष्म्यातून पाहतो. सुखदुःखांच्या वाट्याला जाणं, निसर्गाचा अनुभव घेणं, आपल्या माणसांसोबत वेळ घालवणं - याला आपण दुय्यम मानतो.


घरातल्या आपल्या लोकांशी संवाद साधताना आपण आताशा फक्त औपचारिकपणे बोलतो. आई-वडिलांचे अनुभव ऐकण्याऐवजी त्यांचं बोलणं 'जुनाट' वाटतं. मुलांच्या मनातल्या गोष्टी जाणून घेण्याऐवजी आपण त्यांना फक्त नियम सांगतो. आपल्या जोडीदाराच्या भावनांकडे दुर्लक्ष करून आपण नात्यांमध्ये अंतर निर्माण करतो. आणि या सगळ्याचा परिणाम कधी होतो? जेव्हा हे लोक दूर जातात, आणि आपल्याला जाणवतं की, त्यांच्या सहवासात असतानाचं जगणं आपण गमावलं.

असं का होतं की आपण नेहमी 'आता' चा आनंद घेत नाही? कारण आपण भविष्याचा ताण सतत बाळगतो. आपण विसरतो की, भविष्य नेहमी आपल्या हातात नसतं. जे आहे, ते फक्त 'आताचं' क्षण. पण याच क्षणाचा आपण नेहमी अवमान करतो. लहान गोष्टींमधून आनंद शोधणं ही कला आपल्याला शिकायलाच हवी. एका छोट्याशा गावातल्या शेतकऱ्याची गोष्ट आठवते. त्याच्याकडे फारसं काही नव्हतं - एक छोटीशी झोपडी, दोन बैल, आणि एक बाग. पण तो नेहमी आनंदी असायचा. त्याला विचारलं, 'तुमच्याकडे एवढंच आहे, तरी तुम्ही आनंदी कसे?' त्याने उत्तर दिलं, 'माझ्या आजूबाजूचं जे काही आहे, त्याचा आनंद घेणं मी कधी सोडलं नाही. रोज सुर्योदय पाहतो, माझ्या झाडांच्या सावलीत विसावतो, आणि माझ्या बैलांच्या सोबत दिवसभर काम करतो. मी जे करतो, ते जगतो.'

हे उत्तर ऐकलं की लक्षात येतं की, आपण कितीही यशस्वी झालो, तरीही आपलं 'जगणं' पुन्हा अनुभवणं कठीण होतं. शर्यतीच्या बाहेर पडून थोडं थांबणं, निसर्गाशी संवाद साधणं, आपल्या माणसांशी प्रेमळपणे बोलणं-हीच खरी गरज आहे. आयुष्य खूप छोटं असतं, पण आपण त्याला जखडून टाकतो. एकदा का मोकळं श्वास घ्यायला शिकलो, की 'जगणं' किती सुंदर आहे हे कळतं. शेवटी, हे लक्षात ठेवायला हवं - आयुष्याच्या शेवटच्या क्षणी, आपण काय मिळवलं याचा नाही, तर आपण कसं जगलो याचा विचार मनात येतो. आता तरी थोडं थांबून स्वतःला विचारू या - 'जगणं खरंच राहून तर गेलं नाही ना?'

**सचिन चव्हाण**
रामटेक जि. नागपूर
मो.नं.: ९१५८३९३२६०

### गुल्लेर



नरेंद्र इंगळे
9561226572

## 'काहीच समजत नाही!'

'पाह्य कसा बजार आनला तुह्या देरानं...भोकाचे वांगे आनले.. वायला संभार आनला.. धोळ पालक आनला.. मेथी सोडून मेथा आनला..दोन लेकराचे बाप झाले पन या मानसाले काहीच समजत नाही.'

'घाईघाईत घेतला अशीन बजार.'

'निरखून आनता येत नाही काय? सतरा दुकानं फिरा लागतात.. भाव करा लागते.. हा बुवा एकाच्या जवळचं घेत राह्यते.. काहीच समजत नाही '' नाई वं.. चांगला ग्रॅज्युएट हाय ना तो बुवा.'

'शिकला पन व्यवहार न्यान नाही.. काल किलोभर हरबरा आनला.. सगळा पोचट निंगाला.. ढोराले टाका लागला. सकाऊन पपई आनली तेही सळ्ळी निंगाली.. काहीच समजत नाही.'

'समजत कसं नाही? समजलं म्हनून तुह्याशी लगन केलं किनी?'

' तो मामाजीनं फोर्स केला. नाहीतर या मानसानं अठ्ठावीस पोरी पाह्यल्या.. डोंबळी असली तरी पसनच हाय म्हने.. एक पोरगी भेरकी होती.. हा बुवा म्हने मले चालते'

'साधा मानूस हाय पावना.'

'एवढं साधं नसलं पाह्यजे.. लोकं हासतात.. एक दिवस एक चप्पल माही घातली अन एक त्याहिची घातली.. तेच घालून बजारात गेले.. काहीच समजत नाही.'

'तसा हुशार आहे तुहा नवरा.. लय पुस्तकं वाचते.'

'पुस्तकं वाचते पन इकडे बोंब पडत नाही ना.. रात्री बारा वाजेलोक पुस्तकं वाचते.. गोठ नाही माठ नाही.. बायकोची विचारपूस नाही.. असं असते काय?'

'तसा बोल्यात हुशार हाय तो मानूस.. स्टेजवर भाषन देते.'

'स्टेजवर बोलते पन माह्यापुढे नांगी टाकते.. जसाकाही बोलाले भेते माह्याशी.. मले लट कापते.. आपून काय बोलाव अन् तो बुवा काय बोलते.. बायकोशी कसं बोलावं ते काहीच समजत नाही.'

'चौकात बसून लंब्या बाता करते तो बुवा.'

'फक्त गोष्टीच येतात माह्या नवऱ्याले.. सगळा गोष्टीचा बजार.. बजारात धाडसान त हे भोकाचे वांगे आनते.. काहीच समजत नाही.'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# अमेरिकेकडून युक्रेनला १ अब्ज डॉलरच्या शस्त्रास्त्रांची मदत

वृत्तसंस्था



**सिमी व्हॅली :** अमेरिकेने युक्रेनला १ अब्ज डॉलर किंतीच्या दीर्घकालीन शस्त्रास्त्रांची मदत देऊ केली आहे. अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉइड ऑस्टिन यांनी नुकतीच ही माहीती दिली. नियोजित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्ता ताब्यात घेण्यापूर्वी ही मदत उपलब्ध करून देण्यासाठी बायडेन प्रशासनाने त्वरेने संसदेची मंजूरी मिळवली असल्याचे त्यांनी सांगितले.

दीर्घकाळासाठी शस्त्रास्त्रांची प्रणाली कंत्राटी तत्वावर युक्रेनला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. खरेदी केलेल्या शस्त्रास्त्र प्रणालींचा हेतू युक्रेनच्या भविष्यातील लष्करी क्षमतांना समर्थन देण्यासाठी आहे.

# राष्ट्राध्यक्ष असद यांनी घेतला रशियात आश्रय

वृत्तसंस्था



**दमास्कस :** सीरीयातील बंडखोरांनी राजधानीचे शहर दमास्कसवर ताबा मिळवला. त्यांनी एक एक करत सीरीयातील सर्व शहरांवर कब्जा केला. यामुळे सीरियाचे माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांनी देशातून पलायन केले. त्यांनी रशियामध्ये आश्रय घेतला असल्याचे वृत्त रशियाच्या सरकारी मीडियाने दिले आहे. रशिया हा असाद यांच्या राजवटीत त्यांचा प्रमुख मित्र देश होता. यामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला तेथे आश्रय मिळाला असल्याचे वृत्त आहे.

सीरियातील बशर-अल-असाद सरकारला देशातील बंडखोर गटांनी आव्हान देत जवळपास सर्व सीरियावर ताबा मिळवला. यामुळे ५० वर्षांहून अधिक काळाच्या हुकूमशाहीनंतर असद कुटुंबाने सीरियावरील नियंत्रण गमावले. सीएनएनने रशियातील एका अधिकृत सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे, बंडखोरांनी केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद आणि त्यांच्या कुटुंबाने मॉस्कोला पलायन केले आहे आणि तिथे त्यांना राजकीय आश्रय देण्यात आला आहे .बशर अल-असाद रशियाला पळून गेल्यानंतर सीरियन लोकांनी दमास्कसमधील त्यांच्या निवासस्थानांची तोडफोड केली.



## ७५ हून अधिक ठिकाणी केले हवाई हल्ले

# अमेरिकेचा सीरियावर बॉम्ब हल्ला

वृत्तसंस्था

**सीरिया :** राष्ट्राध्यक्ष देशातून पळून जाताच अमेरिकेने सीरियामध्ये अनेक ठिकाणी हवाई हल्ले केले आहेत. राष्ट्राध्यक्ष बशर अल-असाद यांनी देशातून पलायन केल्यानंतर हे हल्ले करण्यात आले आहेत. सीरियावरील हवाई हल्ल्याचे कारणही अमेरिकेने दिले आहे. सीरियातील बंडखोरांनी देशाची राजधानी दमास्कस आणि राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद यांच्या आलिशान राजवाड्यावर ताबा मिळवला आहे.

५९ वर्षीय हुकूमशहा अध्यक्ष बशर अल-असद युद्धग्रस्त सीरिया सोडून मॉस्कोला पोहोचले. त्याच वेळी, बंडखोरांच्या ताब्यात असलेल्या सीरियामध्ये इस्लामिक स्टेट च्या लक्ष्यांवर अमेरिकेने अनेक हवाई हल्ले केले आहेत. आयएसआयएसचा उदय रोखणे हा अमेरिकेचा उद्देश आहे. यूएस सेंट्रल कमांडने सांगितले की त्यांच्या सैन्याने रविवारी मध्य सीरियामध्ये इस्लामिक स्टेटच्या लक्ष्यांवर डझनभर हवाई हल्ले केले. युद्धग्रस्त देशात इस्लामिक स्टेटचा पुन्हा उदय होऊ नये, हा अमेरिकेच्या या हवाई हल्ल्यांचा उद्देश आहे. या ऑपरेशनमध्ये B-52, E-15 आणि A-10 सह अनेक यूएस एअर फोर्सचा वापर करून ७५ हून अधिक लक्ष्यांवर हल्ला करण्यात आला आहे.

## आयएसआयएसला चोख प्रत्युत्तर मिळेल!

जनरल मायकल एरिक कुरिल्ला म्हणाले, आम्ही आयएसआयएसला पुन्हा संघटित होऊ देणार नाही आणि सीरियातील सध्याच्या परिस्थितीचा फायदा घेऊ देणार नाही, यात शंका नसावी. सिरियातील सर्व संघटनांनी हे जाणून घेतले पाहिजे की त्यांनी घ्घ्घ सोबत भागीदारी केली किंवा त्यांना कोणत्याही प्रकारे पाठिंबा दिला तर आम्ही त्यांना चोख प्रत्युत्तर देऊ. सीरियातील बंडखोरांनी असादच्या राजवटीत अनेक दशकांपासून तुरुंगात टाकलेल्या शेकडो कैद्यांची सुटका केली. या उत्सवी वातावरणात काही लोकांनी दुकानांची तोडफोडही केली. राष्ट्राध्यक्ष असद आणि त्यांच्या कुटुंबीयांचे पुतळे पाडण्यात आले. बंडखोरांनी कर्फ्यू जाहीर करण्यापूर्वी शहरातील लोक आवश्यक वस्तू घेऊन निघून गेले.



**केदारनाथः** उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातील केदारनाथ-बद्रीनाथपासून शिमलापर्यंतच्या शहरांमध्ये हिवाळ्यातील पहिली बर्फवृष्टी झाली आहे. डोंगराळ भागात सर्वत्र बर्फाची पांढरी चादर दिसून येत आहे. रस्ते, झाडे तसेच घरांपर्यंत सर्व काही बर्फाने झाकलेले असल्याने सुंदर दृश्य पाहायला मिळत आहे.

# शंभर कोटी हिंदू रस्त्यावर आले तर !

वृत्तसंस्था

**नवी मुंबई :** बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात नवी मुंबईत हिंदू समाजातर्फे निदर्शने करण्यात आली. या निदर्शनात हिंदू समाजातील हजारो लोक सहभागी झाले होते. इस्कॉनचे प्रतिनिधी अद्वैत चैतन्य महाराज म्हणाले की, सहिष्णुता ही आज हिंदूंची सर्वात मोठी कमजोरी बनली आहे. ज्या बांगलादेशासाठी एकेकाळी हिंदूंनी लढा दिला, तोच बांगलादेश आज तिथे छळत आहे.

चैतन्य महाराज म्हणाले की, आता सर्व हिंदूंनी एकत्र येऊन या अत्याचाराचा निषेध नोंदवणे गरजेचे झाले आहे. संपूर्ण देशात १०० कोटी हिंदू आहेत आणि त्यातील निम्मेही रस्त्यावर आले

## अद्वैत चैतन्य महाराजांचे मोठे विधान





तर जगाला हिंदूंची ताकद कळेल. अध्यात्मिक गुरू स्वामी दीपंकर महाराज यांनी रविवारी सहारनपूर येथे सांगितले की, जेव्हा एकत्र उभे राहण्याची वेळ येते आणि तुम्हाला तुमचे कार्य आठवते, तेव्हा समजून घ्या की तुमचा धर्म संकटात आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात हे आंदोलन करण्यात येत आहे. सहारनपूरचा हिंदू समाज संघटित होऊन हिंदूंमध्ये फूट पडणार नाही आणि हिंदू तोडणार नाही, असा संदेश देत आहे. यावेळी आंदोलकांनी बांगलादेश सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदूंशी होणाऱ्या गैरवर्तनाचा तीव्र निषेध केला. या निदर्शनात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले आणि बांगलादेशात होत असलेले अत्याचार थांबवण्यासाठी भारत सरकारकडे त्वरित आणि कठोर कारवाईची मागणी केली. याशिवाय बांगलादेशातील हिंदू आणि मंदिरांवर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात ठाणे जिल्ह्यात आणि नवी मुंबईत अनेक ठिकाणी पोलिस बंदोबस्तात निदर्शने करण्यात आली.

# इम्रान खानच्या सुटकेसाठी पीटीआय आक्रमक

## आमचा लढा सुरूच राहणार

वृत्तसंस्था



**कराची :** इम्रान खान यांच्या सुटकेच्या मागणीसाठी पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ पक्षाने नव्याने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. पानिपतच्या युद्धाप्रमाणे आम्ही हल्ले करतच राहू. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य केल्या जात नाहीत, तोपर्यंत आमचा लढा सुरूच असेल, असे खैबर पख्तुनख्वा प्रांताचे मुख्यमंत्री अली अमिन गंदापूर यांनी काल पत्रकारांशी बोलताना सांगितले. आतापर्यंत आम्ही केवळ पाचवेळा आंदोलन केले आहे. शेवटपर्यंत आमचे आंदोलन सुरूच असेल, असे गंदापूर म्हणाले. इम्रान खान यांच्या सुटकेच्या मागणीसाठी दिनांक २४ नोव्हेंबर रोजी पीटीआयने इस्लामाबादेत केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने ते बोलत होते.

# भारतीय परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी बांगलादेशात

## द्विपक्षीय संवाद, सहकार्यावर देणार भर

वृत्तसंस्था

**ढाका :** शेजारच्या बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंविरुद्ध सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर भारतीय परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी सोमवारी सकाळी ढाका येथे दाखल झाले. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी ते येथे चर्चा करतील. बांगलादेशमध्ये मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर ही पहिली उच्चस्तरीय अधिकृत बैठक आहे. या भेटीदरम्यान भारत आणि बांगलादेशचे परराष्ट्र सचिव परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत (FOC) अंतर्गत परस्पर सहकार्य



आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा करतील. दोन्ही देशांमध्ये परस्पर हितसंबंधांवर चर्चा केली जाईल, असे बांगलादेश सरकारचे मुख्य सल्लागारांचे प्रवक्ते शफीकुल आलम यांनी ४ डिसेंबर रोजी म्हटले होते. सप्टेंबरमध्ये बांगलादेशचे परराष्ट्र सल्लागार मोहम्मद तौहीद हुसेन यांनी भारतीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली होती. त्यावेळी दोन्ही देशांनी मजबूत कार्यरत संबंध कायम ठेवण्यास आणि द्विपक्षीय चर्चा करण्याचे मान्य केले. अलीकडे बांगलादेशात अल्पसंख्याकांवर हल्ले होण्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. ६ डिसेंबर रोजी ढाकापासून काही अंतरावर असलेल्या महाभाग्य लक्ष्मीनारायण मंदिरात अज्ञात हल्लेखोरांनी आग लावली होती.

# पश्चिम बंगालमध्ये नवीन बाबरी मशीद बांधणार

## आमदार हुमायून कबीरचे धक्कादायक विधान

**कोलकाताः** तृणमूल काँग्रेसचे आमदार हुमायून कबीर यांनी धक्कादायक विधान केले आहे. त्यांनी पश्चिम बंगालमध्ये नवीन बाबरी मशीद बांधण्याचा दावा केला आहे. हुमायून कबीर म्हणाले, मुर्शिदाबाद भागातील बेलडांगा याठिकाणी नवीन बाबरी मशीद बांधली जाणार आहे. बेलडांगा येथे बाबरी मशीद उभारण्याचे काम ६ डिसेंबर २०२५ पूर्वी सुरू होईल असेही त्यांनी म्हटले आहे.

आमदार कबीर पुढे बोलताना म्हणालेत पश्चिम बंगालमध्ये ३४ टक्के मुस्लिम आहेत. पश्चिम बंगालमध्ये त्यांच्या भावना आणि त्यांचे डोके उंच ठेवून जगण्याची इच्छा आणि त्यांच्या हक्कांसाठी मला येथून एक प्रस्ताव ठेवायचा आहे. पैशाची कमतरता भासणार नाही. बेलडांगा येथे असे अनेक मदरसे आहेत. याशिवाय बहरामपूर परिसरात अनेक मदरसे आहेत. सर्व मदरशांचे



अध्यक्ष आणि सचिवांचा समावेश करून १०० किंवा त्याहून अधिक लोकांचा बाबरी मशीद ट्रस्ट तयार केला जाईल. या ट्रस्टच्या वतीने ६ डिसेंबर २०२५ च्या आत या बेलडांगा परिसरात दोन एकर जागेवर बाबरी मशीद उभारण्यात येणार आहे. ते म्हणाले, बंगालचे मुस्लिम समोर येतील आणि संपूर्ण देशाला दाखवून देतील की, मुर्शिदाबादच्या बेलडांगा याठिकाणी पाडलेली बाबरी मशीद स्थापन झाली आहे. मी स्वतः एक कोटी रुपये देईन आणि मला सांगायचे आहे की ६ डिसेंबर २०२५ पर्यंत बेलडांगा येथे बाबरी मशीद स्थापनेचे काम सुरू होईल.

# कॅनडाच्या संसदेत भारतविरोधी प्रस्ताव फेटाळला

**ओटावा :** कॅनडाच्या संसदेत भारतविरोधी प्रस्ताव मांडण्यात आला होता, जो एका भारतीय-कॅनेडियन खासदाराच्या विरोधानंतर फेटाळला गेला आहे. कॅनडाच्या संसदेत १९८४ च्या शिखविरोधी दंगलीला नरसंहार घोषित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता, या प्रस्तावाला खासदार चंद्र आर्य यांनी विरोध दर्शविला होता. या प्रस्तावाला विरोध केल्याप्रकरणी मला धमक्या देखील

## शिखविरोधी दंगलीला नरसंहार प्रस्ताव

मिळाल्या आहेत. संसदेत सादर झालेला हा प्रस्ताव राजकीय स्वरुपात शक्तिशाली खलिस्तान समर्थकांच्या लॉबीकडून प्रस्तावित होता. खलिस्तान समर्थकांच्या लॉबीकडून पुन्हा अशाप्रकारचा प्रस्ताव संमत करविण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

# पाच वर्षांत राज्यातील वनक्षेत्रात आगीच्या 295 घटना

## केंद्रीय मंत्री कीर्ती वर्धन सिंग यांची माहिती


**पणजी :** राज्यातील वनक्षेत्रात गेल्या पाच वर्षांत २९५ आगीच्या घटना घडल्या. यात सर्वाधिक १४७ घटना नोव्हेंबर ते जून २०२२ मध्ये घडल्या असल्याचे केंद्रीय पर्यावरण, वनमंत्री कीर्ती वर्धन सिंग यांनी राज्यसभेतील लेखी प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून समोर आले आहे. नोव्हेंबर ते जूनपर्यंतच्या उन्हाळ्याच्या काळात वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे वनक्षेत्रांमध्ये आग लागण्याच्या घटना घडत असतात. राज्यात गेल्या काही वर्षांपासून अशा घटना सातत्याने घडत आहेत. २०१९-२० मधील नोव्हेंबर ते जूनपर्यंतच्या काळात अशा ४७ घटना घडल्या होत्या. २०२०-२१ मध्ये अशा ४५ घटना घडल्या. २०२१-२२ मध्ये अशा घटनांमध्ये मोठी घट झाली. यावर्षी केवळ २० घटना घडल्या होत्या. परंतु, २०२२-२३ मध्ये राज्यात तब्बल १४७ घटना घडल्या. चालू वर्षी केवळ ३६ घटना घडल्याचे मंत्री कीर्ती वर्धन सिंग यांनी उत्तरातून दिलेल्या आकडेवारीतून दिसून येते.

# मुर्शिदाबादमध्ये बॉम्बस्फोटात ३ ठार

**मुर्शिदाबाद :** पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात बॉम्बस्फोटाची घटना घडली. या घटनेत ३ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून तपासात गुंतले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका घरात बेकायदेशीरपणे देशी बनावटीचे बॉम्ब बनवले जात होते.

# महादेव बेटिंग प्रकरणी गोविंद केडियाला अटक

## १६० कोटींची मालमत्ता जप्त



**रायपूर :** अंमलबजावणी संचालनालयाने महादेव ऑनलाइन बेटिंग प्रकरणाचा मनी लाँड्रिंग अँगलचा तपास करत असताना मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी प्रमुख स्टॉक पोर्टफोलिओ ब्रोकर गोविंद केडिया याला ईडीने अटक केली आहे. ईडीने दिलेल्या माहितीनुसार, तपासादरम्यान काही महत्त्वाची माहिती मिळाली आहे ज्यावरून असे दिसून आले आहे की केडिया स्टॉक मार्केटमध्ये बेकायदेशीर पैसे गुंतवत होते जे महादेव बेटिंग ॲपशी जोडलेले होते. केडिया यांच्या डिमॅट होल्डिंगमध्ये सापडलेल्या १६० कोटी रुपयांची संपत्ती ईडीने जप्त केली आहे.



**ढाका :** बांगलादेशची राजधानी ढाका येथे बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) रविवारी भारताच्या निषेधार्थ भारतीय उच्चायुक्तालयासमोर लाँगमार्च काढला. मात्र, पोलिसांनी हा मोर्चा मध्येच रोखला. यानंतर बीएनपीच्या प्रतिनिधी गटाला पोलिसांच्या मदतीने भारतीय उच्चायुक्तांना निवेदन देण्याची परवानगी देण्यात आली.

# गावठी बॉम्बमुळे पाळीव कुत्र्यांचा मृत्यू

**फोंडा :** वाघुर्मे परिसरात रान डुकरांची शिकार करण्यासाठी अज्ञाताकडून जमिनीवर गावठी बॉम्ब पुरून ठेवण्याचे प्रकार वाढले आहेत. गेल्या १५-२० दिवसांत गावातील सुमारे ५-६ पाळीव कुत्र्यांचा गावठी बॉम्ब फुटल्याने मृत्यू झाला आहे. त्यामुळे वन खात्याने परिसरात गस्त वाढवून शिकार करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी स्थानिक करीत आहेत.

# कुटुंबातील ५ जणांचा कापला गळा

## १३ वर्षांचा नातू गंभीर

**कुरुक्षेत्र :** हरियाणातील कुरुक्षेत्र येथे शनिवारी रात्री एकाच कुटुंबातील पाच जणांचे गळे कापण्यात आले. यातील चौघांचा मृत्यू झाला आहे, तर एका १३ वर्षीय मुलाला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी मृतांचे मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवले असून या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

शाहाबादच्या यारा गावात ही घटना घडली. येथे माजी न्यायाधीश वाचक यांच्या संपूर्ण कुटुंबावर जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला करण्यात आला.

# भाजपला लोकशाही समजत नाही!

## शशी थरूर यांची टीका

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली :** अमेरिकेने भाजपचे आरोप फेटाळल्यानंतर त्या पक्षावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांनी जोरदार टीकास्त्र सोडले. भाजपची वर्तणूक भारतापुढे अडचणी निर्माण करणारी आहे. त्या पक्षाला लोकशाही आणि मुत्सद्देगिरीही समजत नसल्याचे स्पष्ट होते, असे थरूर यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानी यांना लक्ष्य करणारे बदनामीकारक हल्ले होत आहेत. भारतात अस्थिरता निर्माण करण्याच्या उद्देशातून ते कृत्य होत आहे. त्यामागे अमेरिकेचा परराष्ट्र विभाग आणि त्या देशातील काही घटक आहेत, असे आरोप भाजपने केले.

# जननी शिशू सुरक्षेचा २९२४५ गर्भवतींना लाभ

**पणजी :** राज्यातील २९,२४५ गर्भवती महिला आणि ७७४ आजारी बालकांनी केंद्र सरकारच्या जननी शिशू सुरक्षा योजनेचा लाभ घेतलेला आहे. योजनेअंतर्गत केंद्राकडून राज्याला सुमारे १.३१ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून, त्यातील सुमारे १.०५ कोटी रुपयांचा निधी सरकारने खर्च केलेला आहे.

ही सेवा शासकीय आरोग्य संस्थेत उपलब्ध असून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर गरोदरपणाच्या काळात, प्रसूती दरम्यान, प्रसूतीनंतर ४२ दिवसांपर्यंत व एक वर्षे वयापर्यंतच्या आजारी बालकास सेवा पुरविली जाते. मुलांच्या आरोग्याबाबत, संगोपनाबाबत व विनामूल्य उपचाराबाबत आशा, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा लागतो.

केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी राज्यसभेतील लेखी प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून ही माहिती समोर आली आहे. गर्भवती महिला आणि बालकांना तत्काळ आणि मोफत उपचार मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने १ जून २०११ रोजी जननी शिशु सुरक्षा योजना सुरू केली.

## विविध सुविधांचा मिळतोय लाभ

या योजनेअंतर्गत गर्भवती महिला आणि नवजात बालकांना मोफत आणि कॅशलेस डिलिव्हरी, मोफत सी-विभाग, मोफत औषधे आणि उपभोग्य वस्तू, मोफत निदान, आरोग्य संस्थांमध्ये राहताना मोफत आहार, रक्ताची मोफत व्यवस्था, वापरकर्ता शुल्कातून सूट, घरापासून इस्पितळ आणि उपचारांनंतर इस्पितळातून घरापर्यंत मोफत वाहतूक आदींसारख्या सुविधा देण्यात येतात. दरम्यान, गोव्यासह देशभर जननी शिशू सुरक्षा कार्यक्रमाची योग्यरीत्या अंमलबजावणी करण्याकडे आरोग्य खात्याने लक्ष दिलेले आहे.

## राज्याला गतवर्षी मिळाले १.३१ कोटी



# महिला स्वयंसहाय्य गटांना ५२ कोटींची मदत

**पणजी :** दीन दयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशनअंतर्गत गोव्यातील महिला स्वंयसाहाय्य गटांना आतापर्यंत ५२.७ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरातून ही माहिती मिळाली आहे. याबाबत खासदार सदानंद शेट तानावडे आणि खासदार मयंकभाई नायक यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता.

# देवदहिफळमध्ये रंगली कुस्त्यांची दंगल!

## यात्रा राज्यातील मल्ल कुस्तीसाठी दाखल

नवनाथ कांबळे/दिंद्रुड

दिंद्रुड पासून एका कोसाच्या अंतरावर असलेल्या श्री. मल्हारी मार्तंड देवाच्या पावन स्पर्शाने पवित्र झालेल्या श्रीक्षेत्र देवदहिफळ च्या यात्रेतील फडात राज्यभरातील मल्लांनी जंगी कुस्त्या खेळत फड चांगलाच गाजवला. काल दि.०९ सोमवार रोजी येथील खंडोबा देवस्थान कमिटी व समस्त ग्रामस्थांनी या ठिकाणी केलेल्या भव्य कुस्तीचे आयोजन प्रतिवर्षांप्रमाणे याही वर्षी यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. मल्हारी-म्हाळसाकांता च्या पायथ्याला काळ्या मातीत महिला मल्लांसह अनेक नामवंत पैलवानांमुळे येथील कुस्त्यांची दंगल जोरात रंगली. पार पडलेल्या भव्य दंगलीचा आनंद कुस्तीप्रेमींनी बेधुंद पणे घेतला.

धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे श्री. खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त भावीक भक्तांची दर्शनासाठी मोठी रीघ लागली आहे. देवाच्या दर्शनासाठी दीड ते दोन महिने भाविकांची अशीच रीघ चालू राहते. कुस्त्यांच्या दंगलीत राज्यभरातून कुस्तीपटूंनी हजेरी लावली. सकाळी अकरा वाजल्यापासून कुस्ती स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. दहा वर्षां पासून पंचेचाळीस वर्षांपर्यंतच्या कुस्तीपटूंनी या दंगलीत सहभाग नोंदवला. कुस्त्यांमध्ये परिसरासह जिल्हा, परजिल्ह्यातील जवळपास तीनशे पन्नास मल्लांनी कुस्तीचे मैदान गाजवत आपापली ताकद अजमावली.



कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र केसरी शिवाजीराव केकान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच श्रीधर बडे, विलासराव बडे, श्रीहरी बडे, राधाकिसन बडे, बाळासाहेब बडे, दिलीप बडे, विकास बडे, राज बडे, कृष्णा बडे, उत्तम कांदे, रमेश बडे, सिध्दु बडे, बाळु तोंडे, सुनील बडे, अंगद बडे, लखन बडे आदींनी पंच म्हणून काम पाहिले. येथील परिसर, जिल्ह्यासह कोल्हापूर, नांदेड, सोलापूर, जालना, हिंगोली, परभणी, लातूर अशा राज्यातून अनेक जिल्ह्यातील मल्लांनी येथील कुस्त्यांच्या दंगलीत सहभाग नोंदवला. देवदहिफळ येथील नामवंत कुस्तीपटू स्व. गोपीनाथराव मुंडे तालीम चे सिद्धेश्वर बडे तर जय बजरंग तालीम चे अनिकेत गोरे यांची शेवटची ७ हजार शंभर रुपयांची कुस्ती अनिर्णायक सोडवण्यात आली. यावेळी दोघांना समान बक्षीस प्रदान करण्यात आले. योगेश नागरगोजे (कोल्हापूर) व लक्ष्मण करे (सुरनरवाडी) तर सुनिल बडे व भैरव बारस्कर यांच्यात शेवटच्या दोन कुस्त्या झाल्या. यामध्ये किनवट (जि.हिंगोली) येथील मल्ल रूपाली शिंदे हिने भोगलवाडीच्या

पान २ वर...

# जीनियस इंग्लिश स्कूलमध्ये स्पर्धा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिनियस इंग्लिश स्कूल बापुजी नगर धानोरा रोड बीड दिनांक ९ डिसेंबर २०२४ वार सोमवार येथे ५ दिवसीय क्रिडा स्पर्धेच उद्घाटन मा जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंदजी विद्यागर साहेब यांच्या हस्ते संपन्न झाले या प्रसंगी मा नगरसेवक रणजित बनसोडे नगरसेवक भैय्यासाहेब मोरे पत्रकार मंगेश निटुरकर शिक्षक नंदकुमार भोसले सर संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर प्रशांत देशपांडे प्राचार्य पल्लवी देशपांडे मॅ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले या प्रसंगी विद्यार्थ्यांनी मार्च ड्रिल, साँग प्रसंगी सादर केले विघागर सर यांनी आजच्या ५जी च्या युगात खेळाच महत्व सांगितले त्याच बरोबर पालकांनी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मैदानी खेळ खेळु द्यावेत अस आवाहन याप्रसंगी बोलताना जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले तसेच कोणत्याही खेळात यशस्वी होण्यासाठी निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून ते साध्य करण्यासाठी जीवापाड मेहनत करण्याची तयारी ठेवावी व त्यासोबतच सात्विक आणि सर्व पोषण मूल्य मिळतील असा सात्विक, पौष्टिक आहार घ्यावा असे सांगितले.तसेच या कार्यक्रमाचे पाहुणे श्री नंदकुमारजी

पान २ वर...

# माजलगावमध्ये हिंदु समाजाचा मोर्चा

## आक्रमक : बांगलादेश प्रकरणी निघाला मोर्चा

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधि

बांगलादेश मधील हिंदू व बौद्ध समाजावर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ आज माजलगाव शहरात निषेध मोर्चा व धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित मोर्चा व धरणे आंदोलनास माजलगाव शहरातील सकल हिंदू समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बांगलादेशचा निषेध केला



आज दिनांक १० रोजी माजलगाव शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने बांगलादेश मधील हिंदू साधू संतावर व बौद्ध नागरिकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्ह धरणे आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात काही वेळ धरणे आंदोलन देऊन मोर्चा सुरुवात झाली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी चौका मार्गे हा मोर्चा उपविभागीय कार्यालयावर धडकला. उपविभागीय कार्यालयावर जमलेल्या मोर्चेकऱ्यांना ह.भ.प. गडदे महाराज व शिवशंभू विचार मंचाचे कार्यकर्ते पवन मोगरेकर यांनी संबोधित केले. उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात हिंदू समाजावर होणारे हल्ले त्वरित थांबवण्याची मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे

पान २ वर...

# खुन प्रकरणातील आरोपींना फाशी द्या

## गणेश बजगुडे :सरपंच संतोष देशमुखांची निर्घुण हत्या प्रकरण



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची काल निर्घुण हत्या करण्यात आली असुन २४ तास उलटुन देखील आरोपीना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. हा प्रकार अतिशय निंदनीय व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारा असुन या प्रकरणाचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व शिवक्रांती संघटनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे काल दिनांक ०९ डिसेंबर रोजी दुपारच्या

पान २ वर...




बीड : येथील जिल्हा रुग्णालयासमोर नो पार्किंगमध्ये पार्किंग केलेल्या वाहनावर कारवाई करताना वाहतूक शाखेचे पोलीस हेडकॉन्स्टेबल नारायण दराडे आदी.

# ध्वजदिन निधी संकलनासाठी प्रयत्न

## कार्यक्रम:निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामींचे आवाहन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सैनिकाबद्दल आपल्यातील आदराची भावना जपण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून आपले कर्तव्या पार पाडावे तसेच स्वत:ची बांधिलकी म्हणून ध्वजदिन निधी संकलनासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आज जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे जिल्हा नियोजन सभागृहात ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमाप्रसंगी केले.या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी, पोलीस निरिक्षक हनुमंत वारे, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा सैनिकी कार्यालयाचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी


पान २ वर...

# हिमाचलच्या खोऱ्यात वसलेली कथा

## संस्कृतिक : चित्रपट प्रमोशन, पुणेकरांना मंत्रमुग्ध

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

द रॅबिट हाऊस, एक आतुरतेने वाट पाहत असलेल्या फीचर फिल्मच्या टीमने त्यांच्या भारतभरातील प्रमोशनल टूरचा एक भाग म्हणून पुण्याला भेट दिली, जे सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध शहरातील एक संस्मरणीय थांबा म्हणून ओळखले जाते. ट्रेलरने आठवडाभरात यूट्यूबवर १ दशलक्ष व्ह्यूज ओलांडल्याने, चित्रपटाच्या सभोवतालची चर्चा स्पष्टपणे दिसून येत आहे आणि पुणेकरांनी कलाकार आणि क्रू यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. हिमाचलच्या खोऱ्यात वसलेली कथाद रॅबिट हाऊस या चित्रपटाचे चित्रीकरण हिमाचल प्रदेशातील सुंदर खोऱ्यांमध्ये करण्यात आले आहे. ही कथा एका नवविवाहितेची आहे जी तिच्या मर्यादित वैवाहिक जीवनात जउऊया आजाराने त्रस्त असलेल्या तिच्या पतीसोबत स्वातंत्र्य शोधत आहे. मानसिक आरोग्य,




सामाजिक मूल्ये आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांना हा चित्रपट स्पर्श करतो.

चित्रपटाचे दिग्दर्शक वैभव कुलकर्णी म्हणाले, ही केवळ एक कथा नाही, तर त्या अडचणींवर चर्चा आहे ज्याबद्दल लोक सहसा बोलत नाहीत. हिमाचलच्या सौंदर्याने आमच्या कथेला अधिक खोली दिली आहे.सत्त्या २ आणि राजवाडे अँड सन्स या मराठी चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी ओळखला जाणारा अमित रियान पुण्याच्या प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय आहे. पत्रकार परिषदेत आपल्या सहवासाबद्दल बोलताना ते म्हणाले, हे शहर माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. माझ्या मराठी चित्रपटांचे पुण्यातील लोकांनी नेहमीच कौतुक केले आहे. रॅबिट हाऊस हा माझ्यासाठी खूप खास प्रकल्प आहे आणि तो इथे आणताना मला

पान २ वर...

# आरोपीनां कठोर शासन करा: अॅड. विकास जोगदंड

## पवन चक्की कंपनीसह गुत्तेदारांची चौकशी करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील केज तालुका,मस्साजोग येथील सरपंच पती सामाजिक राजकीय क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व संतोष पंडितराव देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी भर दुपारी अज्ञातांनी अपहरण करून अतिशय क्रूर पणे हत्या केल्याने संबंध जिल्हा भरातून हळहळ व्यक्त केली जात असून या दुर्दैवी घटनेचा भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी तीव्र निषेध केला आहे .

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच पवन चक्की कंपनी व संबंधित गुत्तेदारांची देखील चौकशी करून प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष रित्या ज्यांचा ज्यांचा या घटनेत सहभाग



आहे अशा हल्लेखोर आरोपीनां तात्काळ अटक करून कठोर शासन करण्यात यावे अशी मागणी देखील पोलीस अधिक्षक बीड यांचे कडे नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी निवेदनातून केली आहेघडलेल्या घटनेमुळे संबंध मानवी निती

पान २ वर...

## डॉ.सतीश साळुंके हौशी राज्य नाट्य स्पर्धेचे उदघाटन

# रंगभूमीनेच नाट्य चळवळ जिवंत ठेवली

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

हौशी रंगभूमीमुळेच खऱ्या अर्थाने नाट्य चळवळ जिवंत असून यात राज्य शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या राज्य हौशी नाट्य स्पर्धांचा सिंहाचा वाटा असल्याचे प्रतिपादन जेष्ठ नाटककार दिग्दर्शक डॉ. सतीश साळुंके यांनी केले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात ६३ व्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेचे उद्घाटन डॉ.साळुंके यांच्या हस्ते झाले. यावेळी परीक्षक राजा अत्रे, प्रतिभा पाटील, सुधाकर पाटील तसेच पत्रकार सुनील डोंगरे, प्रा. तन्मय शेटगार, कुलदीप धुमाळे, विठ्ठल राजहंस, प्रतीक कांबळे यांच्या सह शहरातील ज्येष्ठ रंगकर्मी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी नटराज पूजन करण्यात आले.

कार्यक्रमात सर्व प्रमुख पाहुण्यांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या भाषणात साळुंके पुढे म्हणाले की, राज्य नाट्य स्पर्धेतून अनेक प्रतिभावान कलावंत नाटककार व तंत्रज्ञ निर्माण झाले. व्यावसायिक रंगभूमीचा खरा आधार हौशी राज्य नाट्य स्पर्धा असल्याचे प्रतिपादन साळुंके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयक मुकुंद धुताडमल यांनी केले. उद्घाटन सोहळ्यानंतर लगेच 'अचानक' या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला. या नाटकाला प्रेक्षकांनी मोठ्या प्रतिसाद दिला. स्पर्धांच्या यशस्वीतेसाठी सहसमन्वयक प्रवीण निसर्गंध, तसेच वैभव निवारे, प्रा अक्षय कोकाटे, प्रदीप मनोहर, राहुल राऊत, पवन नाईकनवरे व अरविंद ढोकणे हे कार्यरत आहेत.



# बेलगुडवाडीत दत्त जन्मोत्सव

## आध्यात्मिक:धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्या निमित्त बेलगुडवाडी येथे श्री गुरुचरित्र कथा सोहळ्यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हभप मधुकर महाराज डोईफोडे यांच्या मधुर वाणीतून ही भव्य कथा संपन्न होणार आहे तरी परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन बेलगुडवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

गेवराई तालुक्यातील बेलगुडवाडी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दि. ८ ते १४ डिसेंबर या काळात या कथा सोहळ्याचे आयोजन केले असून यामध्ये दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० श्री गुरू चरित्र पारायण, सायं. ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० या वेळेत श्री हभप मधुकर



महाराज डोईफोडे यांच्या मधुर वाणीतून ही गुरुचरित्र कथेचे विवंचन होणार असून त्यांना गायन साथ देण्यासाठी संगीत विशारद हभप रामनाथ म.सालपे, भिमराव म.भरती, अंकुश आघाव तर मृदंगसाथ देण्यासाठी सोनाजी म.पवार, हभप ज्ञानेश्वर

पान २ वर...